

दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकःबाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | मंगळवार,दि.१५ एप्रिल २०२५ |वर्षे४थे| अंक२४३वा |पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# उद्धरली कोटी कुळे भिमा तुझ्या जन्मामुळे

- बीड जिल्ह्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात
- जयंतीच्या भव्य मिरवणूकीने वेधले शहराचे लक्ष
- विश्वासातल्या अनेक देशात भीम जयंती होते साजरी
- बाबासाहेबांनी मानव जातीचा उद्धार केला



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:विश्वरत्न, महामानव, बोधिसत्व, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे सोमवार (दि.१४) रोजी सकाळी १० वाजता बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी भिम सागर उसळला होता.आंबेडकरी जनतेने पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करुन महामानवाला अभिवादन केले. दरम्यान बीड जिल्ह्यात विविध उपक्रम राबवून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.विश्वातील अनेक देशात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली जाते. त्या अनुषंगाने बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे सोमवार (दि.१४) एप्रिल रोजी महामानवास अभिवादन करण्यासाठी आंबेडकरी जनतेने अलोट गर्दी केली होती. यावेळी भिख्खु धम्मशिल थेरो, महालिंग निकाळजे, बौद्धचार्य सदाशिव कांबळे, गौतम खेमाडे यांनी उपस्थित आंबेडकरी जनसमुदायाला त्रीशरण, पंचशिल, भिमस्तुती, शरणतय ग्रहण करुन देत उपस्थित आंबेडकरी जनतेला संबोधित केले.दरम्यान जिल्हाधिकारी अविनाश पाठक, पोलीस अधीक्षक, नवनीत कावत, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे,एसडीएम कविता जाधव, सीओ नीता अंधारे, तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार सुहास हजारे या सर्वांच्या हस्ते पंचशिल ध्वजाचे ध्वजारोहण करुन महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी मनोज जरांगे पाटील,आ.संदिप क्षीरसागर, माजी आ.जनार्धन तुपे, सुशीलाताई मोराळे, प्रा.प्रदिप रोडे, अजय सवाई, सचिन मुळुक,अशोक हिंगे,अशोक लोढा, चंद्रकांत नवले, गौतम चोपडे, राजू जोगदंड,अॅड. भगवान कांडेकर,अविनाश जोगदंड, बबन वडमारे, अनिल डोंगरे, अरुणाताई आठवले, सुमेध जोगदंड, ड. राजेश शिंदे, प्रा.अशोक गायकवाड, इंजि स्वप्निल चोपडे, मनोज वाघमारे,गंगाधर काळकुटे, मनोज जाधव, म्हलारी जाधव, यांच्यासह भिम सागर उसळला होता.

## समताज्योत रॅली कौतुकास्पद

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने बीड छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून सोमवारी रात्री १२ वाजता समताज्योत रॅली काढण्यात आली होती. या रॅलीतील समताज्योत युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या हातात देवून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.



## अभिवादन रॅली,मिरवणूक

बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून सकाळी ९ वाजता अभिवादन रॅली काढण्यात आली होती. ही अभिवादन रॅली, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती आणि भारतीय बौद्ध महासभा यांच्यासह शहरातील बौद्ध विहार कमिट्यांकडून काढण्यात आली होती. तर सायंकाळी ६ वाजता भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. शहरातील जवळपास १०० उत्सव समित्या मिरवणूक सहभागी झालेल्या होत्या.





## सार्वजनिक जयंतीचा आदर्श

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून ४ ते १४ एप्रिल या कालावधीत विविध कार्यक्रम पार पडले. १३ तारखेला सुप्रसिद्ध गायक साजन बेंद्रे यांचा भीम गीतांचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला प्रचंड गर्दी लोटली होती.

## असा होता पोलीस बंदोबस्त

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीसाठी पोलीस अधीक्षक नवनीत यांनी तगडा पोलीस बंदोबस्त ठेवला होता. त्या अनुषंगाने तब्बल १०५० पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते. त्यामध्ये ११५ पोलीस कर्मचारी, दंगल नियंत्रण पथक ६, राज्य राखीव दल पथक, ८५० होमगार्ड असा पोलीस बंदोबस्त होता.

## दोनशे वकिलांची अभिवादन रॅली

बीड न्यायालय परिसर, वकील संघ उत्सव समितीकडून संविधान बंधुभाव मोटारसायकल रॅली काढण्यास आली.या अभिवादन रॅलीत देनशे वकील सहभागी झाले होते. वकील संघाचे अध्यक्ष अॅड. रोहिदास येवले, उत्सव समिती अध्यक्ष अॅड. विनायक जाधव, लॉयर फोरम अध्यक्ष अॅड. राहुल साळवे, अॅड. रईस पठाण, अॅड. मधुसूदन बाहेगव्हाणकर, अॅड. समीर पाटोदकर, अॅड. विलास जोशी उपस्थित होते. संचलन अॅड. सुरेश वडमारे यांनी केले.





## राष्ट्रपतींनाही कालमर्यादा

तामिळनाडू सरकारने मंजूर केलेली १० विधेयके अडवून ठेवण्याची कृती बेकायदेशीर असल्याचे निरीक्षण नोंदवून त्यांना फटकारणा-या सर्वोच्च न्यायालयाने आता राष्ट्रपतींनाही विधेयकावर निर्णय घेण्यासाठी तीन महिन्यांची मुदत देण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपतींसाठी वेळेची मर्यादा निश्चित करण्याची ही पहिलीच वेळ आहे. राज्यपालांकडून राष्ट्रपतींकडे पाठवलेली विधेयके आता तीन महिन्यांच्या आत राष्ट्रपतींना निकाली काढावी लागतील, असा ऐतिहासिक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. तामिळनाडू सरकारच्या याचिकेवरील निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने ही टिपण्णी केली. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या या निर्णयाची सर्वत्र चर्चा सुरू झाली आहे.

घटनेच्या कलम २०१ अंतर्गत राष्ट्रपतींच्या निर्णयासाठी कोणतीही कालमर्यादा निश्चित केलेली नसल्यामुळे हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. न्यायालयाने सरकारिया आयोग आणि पुंछी आयोगाचाही उल्लेख केला. ज्यामध्ये कलम २०१ अंतर्गत प्रकरणे निकाली काढण्यासाठी निश्चित कालमर्यादा स्वीकारण्याची शिफारस करण्यात आली होती. अनुच्छेद २०१ अंतर्गत राष्ट्रपतींना विधेयकाचा विचार करावा लागतो आणि हे काम वेळेच्या मर्यादेमुळे मर्यादित असू शकते हे आम्हाला मान्य आहे; परंतु ही वस्तुस्थिती राष्ट्रपतींच्या निष्क्रियतेचे समर्थन करू शकत नाही, असे निकाल पत्रात म्हटले आहे. या प्रकरणावर न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. आर. महादेवन यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, जर एखाद्या संवैधानिक प्राधिकरणाने वाजवी वेळेत आपली कर्तव्ये पार पाडली नाहीत तर न्यायालये त्यामध्ये हस्तक्षेप करू शकतील. जेव्हा राज्यपाल राष्ट्रपतींच्या विचारार्थ विधेयके राखून ठेवतात आणि राष्ट्रपती त्याला संमती देत नाहीत तेव्हा राज्य सरकारला अशा कारवाईला या न्यायालयात आव्हान देण्याचा अधिकार असेल. खंडपीठाने म्हटले आहे की, कोणत्याही वैध कारणाशिवाय किंवा गरजेशिवाय राष्ट्रपतींनी निर्णय घेण्यास विलंब करणे हे संविधानाच्या मुलभूत तत्त्वाच्या विरुद्ध असेल. कोणताही अधिकार मनमानीपणे वापरला जाऊ शकत नाही. खंडपीठाने ८ एप्रिल रोजी राखीव ठेवलेला निर्णय जाहीर केला.

त्यात म्हटले आहे की, तीन महिन्यांपेक्षा जास्त विलंब झाल्यास संबंधित राज्याला त्याबाबत कळवावे लागेल आणि विलंबाचे कारण द्यावे लागेल. तामिळनाडूचे राज्यपाल रवी यांनी राष्ट्रपतींकडे १० विधेयके पाठवली होती. या कृतीला न्यायालयाने बेकायदेशीर आणि चुकीचे असल्याचे म्हटले. राज्यपालांवर विधेयक मंजूर करण्यासाठी सुप्रीम कोर्टाने घातलेली कालमर्यादा हा तर न्यायालयाचा अतिरेक आहे, अशी प्रतिक्रिया केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी दिली आहे. सुप्रीम कोर्टाने राष्ट्रपती व राज्यपालांना विधेयक मंजुरीसाठी निश्चित कालावधी दिला आहे. या निकालाचे पडसाद संपूर्ण देशात उमटत आहेत. जर न्यायालयाने राज्यघटनेत सुधारणा केल्यास संसद व विधानसभेचे काम काय? असा प्रश्न राज्यपाल आर्लेकर यांनी केला. राज्यपालांना विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी राज्यघटनेत कोणतीही कालमर्यादा नाही. न्यायालयाने ३ महिन्यांची मर्यादा घालणे ही घटनादुरुस्ती केल्यासारखाच प्रकार आहे.

दोन न्यायाधीश राज्य घटनेचे स्वरूप बदलू शकत नाहीत. राज्यपालांकडेही कारणे असू शकतात, असे आर्लेकर म्हणाले. केरळच्या राजभवनात कोणतेही विधेयक प्रलंबित नाही. काही विधेयके राष्ट्रपतींकडे पाठवली आहेत. केरळ सरकारने या प्रकरणात सुप्रीम कोर्टात धाव घेतली असून त्याची सुनावणी १३ मे रोजी होणार आहे. केरळ सरकारने सरन्यायाधीश संजीव खन्ना यांना त्यांचा खटला न्या. पारडीवाला आणि न्या. महादेवन यांच्या खंडपीठाकडे पाठवण्याची विनंती केली आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय अतिरेकी असल्याचे सांगताना न्यायालय आपल्या मर्यादा ओलांडत असून कार्यकारी आणि कायदेमंडळात हस्तक्षेप करत असल्याचा आरोपही आर्लेकर यांनी केला आहे. न्यायालयाने तीन महिन्यांची मर्यादा घालणे म्हणजे न्यायालयाकडून घटना दुरुस्ती करण्यासारखेच आहे. न्याय व्यवस्थापन वर्षानुवर्षे अनेक खटले प्रलंबित ठेवते. हे लक्षात घेता राज्यपालांकडेही विधेयके प्रलंबित ठेवण्याची कारणे असू शकतात, अशी भूमिका आर्लेकर यांनी मांडली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधारे तामिळनाडू सरकारने राज्यात १० कायदे लागू केले आहेत.राज्य विधिमंडळाने मंजूर केलेली ही विधेयके शनिवारी राज्य सरकारने अधिकृत राजपत्रात अधिसूचित केली. ज्यामध्ये असे म्हटले आहे की, या कायद्यांना राज्यपाल आर. एन. रवी यांनी मान्यता दिली आहे. तामिळनाडू सरकारचा हा निर्णय देशातील असा पहिलाच प्रकार आहे जिथे राज्य सरकारने राष्ट्रपती किंवा राज्यपालांच्या मान्यतेऐवजी न्यायालयाच्या आदेशाच्या आधारे कायदा लागू केला आहे. गत अनेक दिवसांपासून तामिळनाडूचे राज्यपाल रवी यांनी घटनाबा पद्धतीने विधेयके अडवून ठेवली होती. न्यायालयाने दिलेल्या दणक्यानंतर देशातील विरोधी पक्षातील सरकारमध्ये राज्यपालांची होणारी लुडबूड थांबली जाईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. राज्यपालांनी संसदीय लोकशाहीच्या स्थापित परंपरांचा आदर करून काम करावे. कायदेमंडळाद्वारे व्यक्त होणा-या जनतेच्या इच्छेचा आदर केला पाहिजे आणि जनतेला जबाबदार असलेल्या निवडून आलेल्या सरकारचाही आदर केला पाहिजे हे आता स्पष्ट झाले आहे. राज्यपालांनी मित्र, तत्त्वज्ञानी आणि मार्गदर्शकाची भूमिका नि:पक्षपातीपणे पार पाडली पाहिजे. राजकीय सोयीच्या विचारांनी नव्हे तर त्यांनी घेतलेल्या संवैधानिक शपथेच्या पावित्र्याने मार्गदर्शन केले पाहिजे.राज्यपालांनी मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने निर्णय घेणे अभिप्रेत असताना विरोधी पक्षांची सत्ता असलेल्या राज्यांमध्ये त्यांनी अधिकाराचा गैरवापर केला. या बिगर भाजपशासित राज्यात राज्यपाल पदावरील व्यक्तींच्या माध्यमातून सत्ताधा-यांची अडवणूक करण्याचे प्रयत्न घटनेशी विसंगत आहेत. यात केवळ सत्ताधारी लोकप्रतिनिधींचे अवमूल्यन होते असे नाही तर विरोधकांचेही होते.

# दवाइंडिया ई-फार्मसी आता पुण्यात

## धोरण:९० टक्क्यांपर्यंत मिळणार घरपोच औषधे

पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे:दर्जेदार आणि परवडणाऱ्या आरोग्यसेवेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकत भारतातील सर्वात मोठ्या खासगी जेनेरिक औषध विक्रीची साखळी असलेल्या 'दवाइंडिया' फार्मसी ने पुण्यातही ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म सुरू केला आहे. या प्लॅटफॉर्मद्वारे ६० मिनिटांत नागरिकांना घरपोच औषध मिळू शकणार आहे अन ते देखील ९० टक्के स्वस्त दरांमध्ये. दवाइंडियाकडून १४ प्रादेशिक भाषांमध्ये सेवा दिली जाणार आहे, अशी माहिती झोटा हेल्थकेअर लिमिटेड ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) डॉ. सुजित पॉल यांनी पुण्यात पत्रकार परिषदेत दिली.




महाराष्ट्रात 'दवाइंडिया'चे १०० हून अधिक कंपनीचे स्टोअर्स तर ४० पेक्षा अधिक फ्रँचाईजी स्टोअर्स असून त्यापैकी पुण्यात कंपनीचे २८ आणि ११ फ्रँचाईजी स्टोअर्स आहेत. पुण्यातील रास्ता पेठ आणि मुंबईतील मिरा रोड येथे २४ तास सेवा देणारी स्टोअर्स चालू आहेत. या उपक्रमाचा केंद्रबिंदू म्हणजे 'दवाइंडिया' जेनेरिक फार्मसी ॲप असून ते भारतातील पहिले १४ प्रादेशिक भाषांमध्ये ऑर्डर करण्यास सक्षम औषध ॲप देखील आहे.या ॲपवर २ हजार पेक्षा जास्त उत्पादने उपलब्ध असून ग्राहक औषधांचे ब्रँड, घटक किंवा श्रेणी नुसार शोधू शकतात. त्यावर प्रिस्क्रिप्शन अपलोड करू शकतात आणि ६० मिनिटांत घरपोच किंवा १० मिनिटांत स्टोअरवरून पिकअपसाठी ऑर्डर करू शकतात. 'दवाइंडिया'च्या ऑनलाइन सेवा आता १५ राज्यांतील ६० पेक्षा जास्त शहरांमध्ये उपलब्ध आहेत आणि महाराष्ट्रात ६०० हून अधिक पिनकोड्समध्ये सेवा दिली जात आहे.दवाइंडिया ॲप, हेल्पलाईन किंवा व्हॉट्सॲपवरून सुलभ ऑर्डर करण्याव्यतिरिक्त नोंदणीकृत डॉक्टरांचा मोफत सल्ला, औषध रिफिल अलर्ट आणि फार्मासिस्ट कडून मार्गदर्शन अशी अनेक सुविधा देखील देत आहे. तसेच ग्राहकांसाठी खास ऑफर्स आणि रिवॉर्ड्सही दिले जात आहेत.

झोटा हेल्थकेअर लिमिटेडचे ग्रुप सीईओ डॉ. सुजित पॉल म्हणाले की, दवाइंडिया द्वारे आम्ही भारतातील आरोग्यसेवेची संकल्पना नव्याने मांडत आहोत. उच्च दर्जाच्या जेनेरिक औषधांसह तंत्रज्ञान, वेग आणि समावेशकतेचा समावेश करत आम्ही परवडणारी आरोग्यसेवा अधिक लोकांपर्यंत पोहोचवत आहोत. पुण्यात या संकल्पनेचे अनावरण करणे हे भारताला एक निरोगी देश बनवण्याच्या दिशेने एक पाऊल आहे. भारतातील प्रत्येक कुटुंबाचे उत्पन्न किंवा बोलीभाषा कोणतीही असो, त्यांच्या गरजेवेळी सुरक्षित, प्रभावी आणि परवडणारे उपचार याद्वारे उपलब्ध करून देता येणार आहेत.औषधांच्या वाढत्या मागणीच्या काळात परवडणाऱ्या आरोग्यसेवेच्या वास घेत दावेइंडिया आपल्या अद्वितीय मॉडेल, संपूर्ण रिटेल नेटवर्क आणि स्वस्थ भारत, समृद्ध भारत च्या दृष्टिकोनासह आघाडीवर आहे. हे केवळ डिजिटल सुविधा लाँच नाही तर विश्वास, पारदर्शकता आणि तंत्रज्ञानाचा आधार घेत देशभरात परवडणाऱ्या आरोग्यासाठीच्या मोठ्या चळवळीचे हे पहिले पाऊल आहे. दवाइंडिया स्वस्थ भारत, समृद्ध भारत या दृष्टिकोनासोबत परवडणाऱ्या आणि विश्वासार्ह आरोग्यसेवेच्या राष्ट्रीय अभियानात आघाडीवर आहे.

## बीडमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व रामनवमीनिमित्त मुस्लिम समाजातर्फे पाण्याचे वाटप

### जातीय सलोखा राखण्यात खुर्शीद आलम यांचा स्तुत्य उपक्रम



बीड प्रतिनिधी

बीड शहरात गेल्या काही वर्षांपासून सामाजिक ऐक्य आणि धार्मिक सौहार्द जपण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवले जात आहेत. या पार्श्वभूमीवर बीड नगरपरिषदेचे माजी सभापती व शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांनी रामनवमी दिवशी आणि आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने मुस्लिम समाजातर्फे पिण्याचे पाण्याचे वाटप केले.

सन २०१४ पासून दरवर्षी विविध धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांमध्ये पाण्याचे वाटप करत आलेल्या खुर्शीद आलम यांनी यंदाही दि.६/०४/२०२५ रोजी रामनवमीच्या दिवशी आणि आज १४ एप्रिल २०२५ रोजी बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात बाबासाहेबांच्या अनुयायांसाठी पिण्याच्या पाण्याचे नियोजन केले होते.

या उपक्रमात शहराध्यक्ष तथा माजी सभापती खुर्शीद आलम यांच्यासोबत अनीस भाई, राजु भाई, बबलु भाई, खालेद भाई, कलीम भाई, अझहर भाई, लतिफ पठाण, मोहम्मद शहेबाज, साजेद भाई, रफिक भाई, मुजीब भाई, बब्बर भाई, यांच्यासह अनेक मान्यवरांनी सहभाग घेतला. विविध समाजांमध्ये ऐक्य आणि बंधुत्व निर्माण व्हावे या उद्देशाने राबवण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.सतत जातीय सलोखा राखण्यासाठी प्रयत्नशील असलेले खुर्शीद आलम आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा हा उपक्रम सामाजिक एकतेचा आदर्श ठरत असुन सर्व समाजाच्या वतीने कौतुक होत आहेत,

## माझाच काय कोणाचाच वाढदिवस साजरा करू नका-ॲड. अजित देशमुख

बीड प्रतिनिधी

जिल्ह्यात वाढलेली अनागोंदी, समाज विघातक कृत्य आणि शासनाच्या भोंगळ कारभारामुळे कोट्यावधींच्या बंद पडलेल्या योजना. या सर्वांचा निषेध नोंदवत मी वाढदिवसानिमित्त कोणताही हार-तुरा, पुस्तक, पेन वगैरे न स्विकारण्याचा निर्णय मी घेतला आहे. जन आंदोलनाच्या माध्यमातून आमचे देखील हजारो कार्यकर्ते आहेत. जे आपसात समन्वयाने राहतात. तसं पाहिलं तर सामाजिक कार्यकर्त्यांनी वाढदिवस साजराच करू नये, या मताचा मी आहे. आजपर्यंत मी वाढदिवस साजरा करीत नाही. मात्र सोशल मीडियामुळे कार्यकर्त्यांना वाढदिवसाची माहिती मिळते. आणि त्यातून वाढदिवस साजरा केल्याचा प्रकार पुढे येतो.

सामाजिक काम करताना, जोडले गेलेले हजारो कार्यकर्ते, हे सामान्य परिस्थितीचे असतात. अशा कार्यकर्त्यांचा हार-तुरा, पुस्तक, पेन वगैरेचा खर्च सुद्धा होऊ नये, या मताचा मी आहे. यातून साध्य तर काहीच होत नाही. मात्र कार्यकर्त्यांचा वेळ आणि पैसा वाया जातो. त्यामुळे वाढदिवसाच्या या प्रथा कुठेतरी थांबल्या पाहिजेत. फोन करून अथवा मेसेज टाकून सदिच्छा दिल्या, तरी त्या कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचतात. त्यामुळे वाढदिवस हा खर्चिक ठरू नये, या मताचाही मी आहे. सामाजिक कार्यकर्ते हे केवळ समाज हिताच्या कामाच्या उद्देशाने एकत्र आलेले असतात. त्यांना परस्परांपासून कुठल्याही स्वार्थ नसतो. त्यामुळे अशा अपेक्षा ठेवणे देखील चुकीचे असते.

जिल्ह्यात जलजीवन योजना असेल अथवा अन्य कोणत्याही योजना. त्या सध्या ७० ते ८०% च्या वर बंद पडलेल्या आहेत. कामावर काही लाख, कोटींचा खर्च झालेला आहे. मात्र पुढचा पैसा मिळत नसल्यामुळे कामे बंद आहेत, हे जनतेचे नुकसान आहे.त्याचप्रमाणे कधी नव्हे एवढी अराजकता जिल्ह्यात माजली आहे. सर्वसामान्य या गोष्टीचा तीव्र निषेध करतात. मात्र राजकारणातली गुंडागिरी. भ्रष्टाचार आणि अन्य कारणांमुळे सामान्य जनता त्रस्त झालेली आहे. जिल्ह्यातील हे वातावरण गढूळ होण्यास जे कारणीभूत आहेत, त्यांना अजूनही याचे काही देणे घेणे आहे, असे वाटत नाही. शासनाच्या विचारपूर्वक न घेतलेल्या निर्णयामुळे शासनाकडे निधी उपलब्ध राहिलेला नाही. म्हणून कित्येक योजना बारगळल्या आहेत. त्याचप्रमाणे नवीन योजनांना पैसा देण्यासाठी शासनाकडे पैसा देखील नाही. शासन आता किती हजार कोटींचं कर्ज जनतेच्या डोक्यावर ठेवणार ? हे कळत नाही. कुचकामी धोरणे आणि वाढता भ्रष्टाचार या सर्वाला कारणीभूत आहे. यावर सामान्य जनतेमध्ये विचार मंथन होणे गरजेचे आहे. मात्र सामान्य जनतेला तेवढा वेळ नसल्याने विचारमंथन होत नाही. आणि म्हणून शासन स्तरावर काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचारी, त्याचबरोबर सर्व स्तरातील लोकप्रतिनिधी यांना जनता जाब विचारू शकत नाही. या सर्व बाबी निषेध नोंदवने योग्य आहे. सरकार कोणाचेही असो, ते व्यवस्थित चालले पाहिजे. जिल्ह्यात राजकारणी कोणीही असो, राज्यातील राजकारणी कोणीही असो, ते देखील व्यवस्थित चालले पाहिजेत. त्याचप्रमाणे जनतेची कामे रेंगाळली तर जनतेचे नुकसान होते.

## पवनचक्की कॉपर चोरी प्रकरणातील आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने केले गजाआड !

बीड/प्रतिनिधी

विडा शिवारात आवादा कंपनीने अधिगृहण केलेले थझत्र४८ या पॉंईटवर पवणचक्कीचे इस्टोलेशनचे काम सुरु असलेल्या ठिकाणी कंपनीचे दोन सेक्युरीटी कार्ड यांना चौदा अज्ञात आरोपीतांनी हातपाय बांधुन त्यांना मारहाण करुन पवणचक्कीचे कॉपर केबल कटरच्या सहायाने कापुण एकुण १२,८७,८००/- रु चे कॉपर केबल चोरी केले केल्याची घटना घडली होती त्यावरुन फिर्यादी नामे आकाश भास्कर जाधव व्य. वॉचमन आवादा कंपनी यांनी दिलेल्या फिर्याद वरुन दिनांक ०८/०४/२०२५ रोजी पो.स्टे. केज येथे गु.र.नं. १४५/२०२५ कलम ३१० (०२) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हयाची नोंद झाली होती.



सदर गुन्हयाचे अनुषंगाने आरोपीचा शोध घेवुन अटक करण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक, बीड यांच्या सुचना पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख स्थागुशा बीड यांना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोनि श्री. उस्मान शेख यांनी आपल्या अधिपत्याखालील सपोनि जोनवाल, पोउपनि विघ्ने व पथकातील अंमलदार यांना सदरचा गुन्हा उघडकीस आणुन आरोपी शोध घेण्यासाठी सुचना दिल्या त्यावरुन स्था.गु.शा. पथकाने दिनांक १४/०४/२०२५ रोजी सदर गुन्हयाचे विश्लेषण करुन गोपनिय बातमीदाराचे माहितीने गुन्हयात वापरलेली महेंद्रा बुलेरो गाडीची टोफोग्राफी वरुन माहिती प्राप्त करुन अज्ञात आरोपीतांचा शोध घेवुन एकुण १० आरोपी निष्पन्न करण्यात आले आहे. त्यापैकी १) बबन सरदार शिंदे रा. नांदुर ता.केज, २) धनाजी रावजी काळे रा. लक्ष्मी पारधीवस्ती जि.धाराशिव, ३) मोहन हरि काळे रा. रा. लक्ष्मी पारधीवस्ती जि. धाराशिव, ४) लालासाहेब सखाराम पवार रा. दसमेगाव ता. वाशी, जि.धाराशिव यांना स्था. गु. शा. पथकाने ताब्यात घेतले असुन त्यांचेकडुन एकुण ११,५८,५००/- रु चा मुद्देमाल व गुन्हयात वापरलेली बुलेरो वाहन जप्त करण्यात आलेले आहे.सदर आरोपीतांचे चौकशी दरम्यान त्यांनी बीड जिल्हयात खालील प्रमाणे गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहे. पो.स्टे.केज येथे गु.र.नं. १४५/२०२५ कलम ३१०(०२) भा.न्या.सं. पवनचक्की कॉपर वायर दरोडा

पो.स्टे. नेकनुर गुरनं ११/२०२५ कलम ३०३ (०२) भा.न्या.सं. ट्रॉन्सफर कॉपर वायर चोरी पो.स्टे. केज गुरनं ११०/२०२५ कलम ३३४ (०१) भा.न्या.सं.कॉपर वायर चोरी पो.स्टे. पाटोदा गुरनं ३५९/२०२४ कलम ३०३ (०२), ३२४(४), (५) भा.न्या. सं. पवनचक्की कॉपर वायर चोरी सदर आरोपी हे अभिलेखावरील मालाविरुध्दचे व शरिराविरुध्दचे एकुण २७ गुन्हे दाखल असून ते एकत्र येवुन संघटीत होवुन गुन्हे करण्याचे सवयीचे असल्याने त्यांचेवर मकोका कायदा अन्वये कारवाई करण्यात येणार आहे.सदरची कामगिरी ही मा. नवनीत कॉंवत पोलीस अधीक्षक बीड, मा.अपर पोलीस अधीक्षक, बीड व पो.नि. श्री. उस्मान शेख यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि विजयसिंह जोनवाल, पोउपनि महेश विघ्ने, ग्रे. पोउपनि हनुमान खेडकर, पोह/महेश जोगदंड, भागवत शेलार, तुषार गायकवाड, गणेश मराडे, पोशि/बाप्पासाहेब घोडके यांनी मिळुन केलेली आहे.

पान सहा वरून

**शासकीय कार्यालयासमोर**

व पोलिस प्रशासनाने अवैध दारू विक्री करण्यासाठी परवानगी दिली आहे त्यामुळे कार्यवाही केली जात नाही तरी नेमके चिंचोली माळी येथील धाब्यावाल्या समोर प्रशासनान हतबल झाले आहे असा प्रश्न नागरिकांना पडला चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**महापुरुषांच्या विचाराने परिवर्तन**

युनिव्हर्सिटीने त्यांना सिम्बॉल ऑफ नॉलेज ही पदवी प्रदान केली या याप्रसंगी शिवसेना उ.बा.ठा. चे लोणार शहर प्रमुख गजाननजी जाधव, युवा शहर प्रमुख श्रीकांत मादनकर, युवा तालुका उपप्रमुख अमोल सुटे, यांनीही आपले विचार मांडले या कार्यक्रमासाठी चिंचोलीचे सरपंच पंजाबराव घुगे, उपसरपंच दशरथ कांबळे, भारतीय जनता पार्टी साहेबराव पाईकराव, ग्रामपंचायत सदस्य रवी सुटे, गजानन आघाव, रघुनाथ सांगळे, शेषराव सांगळे, दत्तात्रय जाधव, दिनकर कांबळे, सोनू सांगळे, आदी मान्यवरांची उपस्थिती होती या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनकर कांबळे यांनी केले तर आभार सरपंच पंजाबराव घुगे यांनी मानले.

**बीएसएनएल कार्यालयात**

तसेच ही संयुक्त जयंती १९८९ पासून बीड बीएसएनएल कार्यालयात साजरी करण्यात येते हे सुद्धा नमूद केले.

यावेळी अध्यक्षीय समारोप करताना उपमहाप्रबंध श्री अनारे साहेब यांनी शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हा महामंत्र डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला असे नमूद केले. यावेळी उपविभागीय अभियंता श्री अनिरुद्ध कुलकर्णी श्री मनोहर कैवाडे, अजय घोडमारे जगदीश सिंनधव, ठाकूर साहेब, पोकळे साहेब, वरुडे साहेब, राऊत मारे अश्विनपालसिंगनकार, शारदा कुमारी हे उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री राहुल सोनवणे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डी न जाधव, रवींद्र वडमारे, ढेपे प्रशांत कुमार नीरज कुमार जगदीश सिंधव परिश्रम घेतले.

**न्यायाधीशपदी झाली**

यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक झोरी नारायण,राजेश काळे,काटकर विरभद्र,दीपक चाळक,परमेश्वर वाघमोडे,श्रीम.गाढवे मंगल,कंगळे आशा व हंडीबाग सुषमा यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास शाळेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक चाळक यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार झोरी नारायण यांनी मानले.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## दहागांव-वासिंद रिक्षा चालक-मालक संघटना शाखेची स्थापना

**शहापूर :** रिक्षा चालक-मालक संघटना दहागाव-वासिंद या संघटना शाखेची स्थापना करण्यात आली आहे. दहागांव-वासिंद अशा फेऱ्यात अनेक रिक्षा असून सदर रिक्षा चालकांच्या असलेल्या समस्या व प्रवाशांचेही असलेल्या प्रश्नांचे निवारण व्हावे यासाठी कोकण विभाग रिक्षा-टॅक्सी महासंघाच्या अंतर्गत रिक्षा चालक-मालक संघटना दहागांव-वासिंद या शाखेची स्थापना करण्यात आली आहे. या झालेल्या रिक्षा चालक-मालक दहागांव-वासिंद संघटनेच्या अध्यक्षपदी अशोक देसले, उपाध्यक्षपदी विजय धानके, मोहन धानके, सचिवपदी प्रमोद म्हात्रे, सहसचिव गोपाळ मसणे, खजिनदार भगवान गिते व सहखजिनदार विपूल धानके यांची निवड करण्यात आली आहे. या संघटना स्थापनावेळी संघटनेचे ठाणे ग्रा. जिल्हाध्यक्ष कृष्णा अंदाडे, संघटना शहापूर तालुका संस्थापक शिवाजी खारीक, संस्थापक अध्यक्ष अशोक शेट्टे, खातिवली-वासिंद सेवा सोसायटी संचालक जयराम पवार, उपसरपंच संजय पवार, सामाजिक कार्यकर्ते श्याम धानके, प्रवीण देसले, लक्ष्मण शेलार, निखिल चंदे, कृष्णा परटोळे, दत्तात्रय मसणे, रमेश देसले, तानाजी मसणे आदी उपस्थित होते.

# जिल्ह्यात अवैध वसतिगृहातून २९ बालकांची सुटका

## या प्रकरणी संस्थेच्या संचालकासह पाच जणांवर गुन्हा दाखल

◆ **ठाणे (प्रतिनिधी):**

ठाणे जिल्ह्यातील खडवली येथे 'पसायदान विकास संस्था' या नावाने चालविल्या जाणाऱ्या एका अनधिकृत बालकांच्या निवासी संस्थेतून जिल्हा प्रशासनाने तातडीने कारवाई करत २९ बालकांची सुटका केली आहे. संस्थेत बालकांना जबर मारहाण तसेच अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार होत असल्याची तक्रार चाईल्ड हेल्प लाईनवर प्राप्त झाल्यानंतर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या पथकाने पोलिसांच्या मदतीने ही कारवाई केली. या प्रकरणी संस्थेचे संचालक, त्यांच्या पत्नी, मुलगा आणि त्यांना मदत करणारे दोन अशा एकूण पाच जणांविरुद्ध बाल न्याय अधिनियम २०१५ आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम २०१२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, १० एप्रिल रोजी चाईल्ड हेल्प लाईनवर खडवली येथील 'पसायदान विकास संस्था' बाबत तक्रार आली होती. तक्रारीमध्ये संस्थेत बालकांना शारीरिक मारहाण केली जात असून लैंगिक अत्याचार होत असल्याचे नमूद करण्यात आले होते. या तक्रारीची तातडीने दखल घेत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या पथकाने



११ एप्रिल रोजी पोलिसांना सोबत घेऊन संस्थेची पाहणी केली. या पाहणीदरम्यान आणि बालकांशी संवाद साधल्यानंतर त्यांना शारीरिक इजा पोहोचेल, अशा प्रकारे मारहाण तसेच अल्पवयीन मुलींसोबत लैंगिक अत्याचार झाल्याचे उघडकीस आले.

या गंभीर प्रकाराची दखल घेत पोलिसांनी तत्काळ कारवाई करीत संस्थेत असलेल्या २९ बालकांची सुटका केली. यामध्ये २० मुली आणि ९ मुलांचा समावेश आहे. सुटका केलेल्या सर्व बालकांना बाल कल्याण समितीसमोर सादर करण्यात आले. समितीने रात्री उशिरापर्यंत या बालकांच्या देखरेखेबाबत आदेश देण्याची प्रक्रिया पूर्ण केली.

या प्रकरणी संस्थेचा संचालक बबन नारायण शिंदे, त्यांची पत्नी आशा बबन शिंदे, संचालक मुलगा प्रसन्न बबन शिंदे, त्यांना मदत करणारा प्रकाश सुरेश गुप्ता आणि दर्शना लक्ष्मण पंडित या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्व आरोपी खडवली येथील रहिवासी आहेत. सुटका करण्यात आलेल्या बालकांपैकी काही खडवली येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत होते. त्यांची आगामी परीक्षा लक्षात घेता, शिक्षण विभागाने त्यांच्या परीक्षेसाठी विशेष व्यवस्था करावी, यासाठी शिक्षणाधिकारी कार्यालयाशी समन्वय साधण्यात येत आहे.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाने या प्रकरणी तत्परतेने कार्यवाही केली असून, बालकल्याण समितीच्या आदेशानुसार सर्व बालकांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे. सध्या या बालकांना उल्हासनगर येथील मुलींचे विशेषगृह/बालगृह तसेच कनिष्ठ व वरिष्ठ मुलांचे शासकीय बालगृहात सुरक्षितपणे दाखल करण्यात आले आहे.

### बालकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासन नेहमीच कटिबद्ध

या कारवाईनंतर जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी सांगितले की, "बालकांची सुरक्षितता आणि त्यांचे हित हे प्रशासनाचे नेहमीच प्राधान्य राहिले आहे. बालकांच्या शोषणाबाबत आमची भूमिका 'झीरो टॉलरन्स'ची आहे आणि बालकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासन नेहमीच कटिबद्ध आहे. अशा गैरकृत्यांची तत्काळ दखल घेऊन दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, जेणेकरून भविष्यात कोणीही बालकांच्या भविष्याशी खेळण्याचे धाडस करणार नाही."

> "आपल्या आसपास कोणत्याही स्वरूपाची बालकांसाठीची निवासी संस्था अनधिकृतपणे चालविली जात असल्यास किंवा बालकांचे शारीरिक, लैंगिक, मानसिक किंवा इतर कोणत्याही प्रकारचे शोषण होत असल्यास, तत्काळ १०९८ या चाईल्ड हेल्प लाईन क्रमांकावर संपर्क साधावा. बालकांच्या अनधिकृत निवासी संस्था चालवणे आणि त्यांचे शोषण करणे हा बाल न्याय अधिनियमानुसार गंभीर गुन्हा आहे. याबाबत नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे."
>
> **- संतोष भोसले अधिकारी,** जिल्हा महिला व बाल विकास

# आपल्या सुट्टीतून असा आनंद मिळवा



**विनायक बेटावदकर**
**कल्याण**

गेल्या आठवड्यात शालेय विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षा पार पडल्या. काहींच्या अजूनही सुरू आहेत. या सर्व मुलांना आता सुट्टीचे वेध लागले आहेत. पूर्वी करमणुकीची विशेष साधने नव्हती. तेव्हा लहानमुले आईबरोबर मामाच्या गावी (आजोळी) जात. त्यावेळी गावी छोटे-मोठे उद्योग नसल्याने बहुतेकजण शेतीवरच अवलंबून असत. शेतीवर सर्व कुटुंबाचे घर चालवणे शक्य होत नसल्यामुळे कुटुंबातील काही माणसे मुंबईत किंवा अन्यत्र नोकरी व्यवसायानिमित्त जात. वर्षभर काम केल्यावर गणपती, होळी, दिवाळी अशा सणांना किंवा मुलांच्या वार्षिक परीक्षा झाल्यावर मुले आईबरोबर गावी जात शक्य असेल तर पालक स्वतःही दोनचार दिवस फारतर आठ दिवस त्यांच्याबरोबर गावी जात, कुटुंबासोबत राहत. एकमेकांची खुशाली विचारीत. घरातील वडीलधाऱ्या मंडळींना नवीन कपडे घेत. गावातील आपल्या मित्रांना भेटत. मजा करीत.

आता तशी परिस्थिती राहिली नाही. वाहतुकीच्या सोयी झाल्याने लोकांकडे स्वतःची वाहने आल्याने आपल्या गावी केव्हाही जाता येते. आपल्या कोकणातही गावागावात रस्ते झाल्याने, ग्रामीण भागात लघु उद्योगांना चालना देण्याच्या धोरणाने, गावागावांत बस वाहतुकीची सोय झाल्याने गावे जवळ आली. मुंबईत फक्त कोकणातूनच माणसे आली असे नाही, तर जळगाव, नागपूर, नगर, अकोला अशा महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागातून आली आहेत. ती सर्व मोठ्या सुट्ट्यांमध्ये आपापल्या गावी जातात. आता वाहतुकीची चांगली साधने झाली. पक्के रस्ते झाल्याने नाशिक, जळगाव, पुणे, मुंबई असा प्रवास हा काही तासांचा झाला आहे. त्यामुळे मामाच्या गावाला जाण्याचा आनंद कायम असला तरी त्यात नाविण्य मात्र राहिले नाही. मुले मामाच्या गावाला एरवीसुद्धा जावू-येऊ शकतात. शिवाय गावी जाण्यापेक्षा निरनिराळ्या उपक्रमात स्वतःला गुंतवून घेण्याचा मुलात कल अधिक दिसतो. मोठ्या सुट्ट्यात निरनिराळ्या संस्थांतर्फे शिबिरांचे आयोजन केले जाते. त्यातून मुलांना निरनिराळ्या प्रकारचे शिक्षण दिले जाते. शिबिरात मिळालेल्या शिक्षणाचा समाज कार्यासाठी उपयोग तर होतोच; परंतु स्वतःच्या जीवनातही व्यक्ती विकासासाठी त्याचा उपयोग होत असतो. मोठ्या सुट्ट्यांमध्ये मुलांनी एकत्र जमून महाराष्ट्रातील गड किल्ल्यांना भेटी द्याव्यात हा खूप छान उपक्रम आहे. त्यामुळे आपला इतिहास समजण्यास मदत होते. गावात निरनिराळे उपक्रम राबवावे. गावातील वाचनालयातील पुस्तकांचे वाचन करावे. रोज एक किंवा दोन वर्तमानपत्र वाचावी. इंग्रजी वाचण्याचा सराव करावा. त्याचा जीवनात खूप उपयोग होतो. छोट्या सहलीतून आपल्या परिसरातील निसर्गाचा मुलांनी परिचय करून घ्यावा. घरातील वडीलधाऱ्या मंडळींच्या मार्गदर्शनाखाली पोहणे, सायकलिंग, मोठ्या मुलांनी (तरुणांनी) बाईक याचे शिक्षण घ्यावे. जी मुले गावी जातात त्यांनी तेथील मातीचा परिचय करून घ्यावा. शेतीची अवजारे कोणती आहेत. शेतकरी त्यांचा कसा उपयोग करतो. त्या मातीत कोणती पिके घेतली जातात. हे सर्व जाणून घ्यावे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे दिवसभर केलेल्या आपल्या कामाची दैनंदिनीत नोंद करावी. अशा प्रकारे आपल्या सुट्टीचा उपयोग केला, तर चांगल्या सवयी लागून जीवन समृद्ध होण्यास निश्चित सहाय्य होईल.

## वेचक

### मुरबाडमध्ये हनुमान जयंती उत्साहात



**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील ग्रामीण तसेच आदिवासी पट्ट्यात व म्हसा, धसई, टोकावडे, सरळगाव, तसेच मुरबाड शहर परिसरात शनिवारी चैत्र पौर्णिमा निमित्ताने तालुक्यातील १२६ ग्रामपंचायत तसेच ५६ वाड्या-पाड्यावर जय हनुमान जन्मोत्सव निमित्ताने बहुतांशी गावांमध्ये पालखी सोहळा काढण्यात आला. तसेच रामनवमी ते हनुमान जयंती या सात दिवसांत ज्ञानेश्वरी पारायण तसेच अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करून त्यामध्ये हरिपाठ, प्रवचन व कीर्तन सेवेद्वारे प्रबोधन करण्यात आले. रविवारी सकाळी ९ ते १२ या दरम्यान काल्याचे कीर्तन सेवा करण्यात आली. त्यानंतर प्रत्येक गावामध्ये दहीहंडीचे कार्यक्रम करून सर्व भक्तांनी-भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. हनुमान जयंती निमित्ताने विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे विविध ठिकाणी प्रबोधन करण्यात आले.

### रोटरी क्लबतर्फे शाळेसह पोलीस ठाण्याला शुद्ध पाण्याचे कुलर



**भाईंदर :** नया नगर पोलीस ठाणे तसेच महापालिकेची प्राथमिक शाळा आणि आदिवासी विद्यार्थ्यांच्या शाळेला रोटरी क्लब ऑफ मीरा रोडने पिण्याच्या शुद्ध पाण्याचे कुलर भेट दिले. गरजू लोकांना आवश्यक साधनांची उपलब्धता करून देण्यासाठी विविध प्रकल्पांवर काम करणाऱ्या मीरा रोड रोटरी क्लब अणि मुंबई रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने मीरा रोड येथील नया नगर पोलिस ठाणे तसेच महापालिकेची गुजराती प्राथमिक शाळा क्र. २१ आणि आदिवासी सेवा मंडळ संचालित मिरे शाळा येथे पिण्याच्या शुद्ध पाण्याचे कुलर भेट देण्यात आले. रोटरी क्लबचे अध्यक्ष आनंद भटकळ यांनी दिलेल्या माहितीनुसार सत्यन इसरानी, प्रमोद पुरी यांनी उपलब्ध करून दिलेल्या सीएसआर निधीद्वारे तसेच डॉ. संजीव गांधी यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला.

### पारमिता धर्मादाय न्यास कल्याणतर्फे शालोपयोगी साहित्याचे वाटप




**कल्याण :** पारमिता धर्मादाय न्यास कल्याण (पश्चिम) यांच्यातर्फे इंदौर (मध्य प्रदेश) येथील श्री वामा शीशु विहार शाळेतील जवळपास ६० विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे न्यासाचे अध्यक्ष बालकदास मेश्राम, सचिव मधुसूदन राऊत, खजिनदार अनिल मेश्राम, विश्वस्त गंगाधर मेश्राम, मुकुंद अंबादे, विश्वनाथ जांभुळकर यांच्याकडून मोफत वाटप करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता दिक्षित, व्यवस्थापक माधुरी मोयडे आणि शिक्षक वर्ग कार्यक्रमास उपस्थित होते. पारमिता धर्मादाय न्यास कल्याणतर्फे शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत शालोपयोगी साहित्याचे वाटप केल्याबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका, व्यवस्थापक, विद्यार्थ्यांनी न्यासाच्या सर्व विश्वस्तांचे आभार मानले.

### कळवा खाडीत अज्ञात व्यक्तीचा मृतदेह

**ठाणे :** कळवा येथील पारसिक रेतीबंदर खाडीत एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची नोंद कळवा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिसांनी हा मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात पाठविला आहे. या मृतदेहाची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. कळवा येथील गणपती विसर्जन घाट जवळ असलेल्या पारसिक-रेतीबंदर खाडीमध्ये एका अज्ञात पुरुषाच्या (४०) मृतदेह खाडीच्या किनाऱ्याजवळ आढळला. याची माहिती रहिवाशांनी कळवा पोलीस ठाण्याला दिली. माहिती मिळताच, कळवा पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांकडून या मृतदेहाची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे.

## फ्लेमिंगोंचे डीपीएस तलावात पुन्हा आगमन

**वाशी :** नेरूळ येथील डीपीएस तलावात पुन्हा एकदा गुलाबी फ्लेमिंगोंचे आगमन होऊ लागले असून, पर्यावरणप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे. भरती-ओहोटीच्या पाण्याचा प्रवाह अंशतः पूर्ववत झाल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली असून, यामुळे ही जैवविविधतेसाठी महत्त्वाची पाणथळ जागा पुन्हा सजीव होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

गेल्या काही वर्षांपासून काही स्वार्थी हस्तक्षेपांमुळे तलावातील नैसर्गिक जलप्रवाहात अडथळे निर्माण झाले होते. त्यामुळे या परिसंस्थेवर प्रतिकूल परिणाम झाला होता; मात्र स्थानिक पर्यावरणप्रेमींनी सातत्याने पाठपुरावा करून या ठिकाणी जलप्रवाह सुरळीत करण्याचे प्रयत्न चालवले होते. याचेच सकारात्मक परिणाम आता दिसू लागले आहेत. शनिवारी (दि. १२) झालेल्या संयुक्त पाहणी दौऱ्यात नवी मुंबई खारफुटी विभागाचे अधिकारी, पर्यावरण संस्था आणि स्थानिक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## नराधम विशाल गवळीने तळोजा जेलमध्ये केली आत्महत्या

◆ **कल्याण (वार्ताहर) :**

काही महिन्यांपूर्वी कल्याणमध्ये अवघ्या १३ वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करणारा नराधम विशाल गवळी याने आत्महत्या केल्याचे समोर आले आहे.

विशाल गवळी याला नवी मुंबईच्या तळोजा मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले होते. त्याने रविवारी पहाटे चार ते पाचच्या दरम्यान तुरुंगातील शौचालयात जाऊन गळफास लावून घेतला. यामध्ये त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे तळोजा कारागृहात एकच खळबळ उडाली आहे. सध्या निवृत्त न्यायमूर्तींमार्फत या प्रकरणाची चौकशी सुरू आहे, तर विशाल गवळी याचा मृतदेह दक्षिण मुंबईतील जे. जे. रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे.

विशाल गवळीने आत्महत्या केल्याची बातमी समोर आल्यानंतर मृत मुलीच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले. मुलीच्या वडिलांनी आपल्या लेकीच्या तसबिरीला हार



घालत आणि त्याच्यासमोर दिवा लावून पूजन केले. यानंतर त्यांनी सांगितले की, आमच्या दीदीसोबत नराधमाने जे कृत्य केले, त्यासाठी आम्ही कोर्टात लढत होतो. विशाल गवळीने जे काही कृत्य केले होते, त्याची शिक्षा त्याला देवाने दिली. त्याच्यासोबत 'जशास तसा' न्याय झाला.

यासाठी मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानतो. पोलिसांनीही आम्हाला खूप सहकार्य केले आणि पाठिंबा दिला. मी त्यांचाही आभारी आहे. प्रशासनाने चांगले काम केले आहे, असे पीडित मुलीच्या वडिलांनी म्हटले.

यावेळी त्यांनी विशाल गवळीचे कुटुंबीय अजूनही कल्याणमध्ये दहशत पसरवत असल्याचा आरोप केला. विशाल गवळी याचे दोघेही भाऊ तडीपार आहेत. ते या परिसरात दहशत निर्माण करायचा प्रयत्न करत असतात. त्यांच्याकडे हत्यारे आहेत. विशाल गवळी याचे वडीलही गुन्हेगारी वृत्तीचे आहेत. ते आमच्या कुटुंबावर हल्ला करू शकतात, अशी भीती मुलीच्या वडिलांनी बोलून दाखवली.

बालिकेच्या हत्येनंतर कल्याण, डोंबिवली शहर परिसरात विशाल गवळीला फाशी द्या या मागणीसाठी महिला संघटना, सामाजिक संस्था यांनी मोर्चे काढून घडल्या घटनेचा निषेध सुरू केला होता. विशाल गवळीला फाशी होत नाही तोपर्यंत हे निषेध मोर्चे सुरूच राहतील, असे इशारा सामाजिक संस्थांनी शासनाला दिले होते. विशालने गळफास घेतल्याचे वृत्त रविवारी सकाळी शहरात पसरताच विविध स्तरातून तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करण्यात येत होत्या.

## दुचाकीच्या धडकेत सेवक महिला गंभीर जखमी

**डोंबिवली :** डोंबिवली पूर्व भागात प्रगती महाविद्यालयाजवळील चौकात वाहतूक विभागातील वाहतूक सेवक निशा जाधव शुक्रवारी वाहतूक नियोजनाचे काम करत होत्या. यावेळी एका दुचाकी स्वाराने भरधाव वेगात दुचाकी चालवून वाहतूक सेवक जाधव यांना पाठीमागून जोराची धडक दिली. या धडकेत त्या जमिनीवर कोसळल्या. त्यांना गंभीर दुखापत झाली आहे. वाहतूक सेवक जाधव यांनी जखमी अवस्थेत तोल सांभाळत ठोकर देणाऱ्या दुचाकी स्वाराला रोखण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी दुचाकी स्वाराने जखमी निशा जाधव यांना मदत करण्याऐवजी त्यांचा हात जोराने पिळला. त्यांना भर रस्त्यात मारहाण केली. वाहतूक सेवक निशा जाधव यांनी याप्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात दुचाकी स्वारा विरुद्ध निष्काळजीपणे दुचाकी चालवून जीविताला धोका निर्माण केल्याची, तसेच मारहाणीची तक्रार केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जवादवाड यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## नवी मुंबई परिसरात डिजिटल बोर्डची मुदत संपल्यानंतरही 'जैसे थे'स्थिती

◆ **नवी मुंबई (प्रतिनिधी):**

गेल्या वर्षी १३ मे रोजी घाटकोपरमध्ये एक मोठे इलेक्ट्रॉनिक डिजिटल होर्डिंग कोसळून १६ जणांचा मृत्यू झाला आणि ७४ जण जखमी झाले; परंतु नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील विद्युत रोषणाई डिजिटल जाहिरात फलकांबद्दल माहिती मागितली, ज्यामध्ये मुदत संपल्यानंतरही हे फलक उघडपणे रोषणाई करत आहेत, अशी माहिती कायद्याचे विद्यार्थी रूपेश रवीढोने यांना माहिती अधिकार कायद्याअंतर्गत प्राप्त झाली आहे.

नवी मुंबई मनपा परवाना विभागाचे अधीक्षक तात्या गायकवाड यांनी माहितीच्या अधिकाराखाली ही माहिती दिलेली आहे. सीबीडी बेलापूर, नेरुळ, वाशी परिसरातील मान्यताप्राप्त जाहिरात कंपन्यांनी बसवलेल्या इलेक्ट्रिक बोर्डांचा परवानगी कालावधी संपला आहे. मुदत संपल्यानंतरही प्रकाशमान असणारे इलेक्ट्रॉनिक बोर्ड कधीही कोसळू शकतात आणि आपत्ती निर्माण करू शकतात, ज्यामुळे निष्पाप नागरिकांचा मृत्यू होऊ शकतो आणि इतर नुकसान देखील होऊ शकते, अशी शंका रूपेश रवीढोने यांनी व्यक्त केली आहे.

यासंदर्भात रवीढोने यांनी नवी मुंबई मनपा आयुक्त डॉ. कैलाश शिंदे यांच्यासह मुख्यमंत्र्यांना ईमेल पाठवून तक्रार केली आहे की, घाटकोपर होर्डिंग अपघातासारखी घटना नवी मुंबईत घडण्याची महापालिका वाट पाहत आहे का? याशिवाय, त्यांनी या सर्व बेकायदेशीर इलेक्ट्रॉनिक बोर्ड कंपन्यांवर दंड आकारून त्यांना तत्काळ बंद करण्याची आणि त्यांना काळ्या यादीत टाकण्याची त्यांनी मागणी केली आहे.

## शिळफाटा रस्ता आज अवजड वाहनांसाठी १२ तास बंद

### डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त वाहतुकीत बदल

◆ **कल्याण (वार्ताहर):**

राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त कल्याण-डोंबिवली शहरांच्या विविध भागात मिरवणुका निघणार आहेत. या मिरवणुका शांततेत, वाहतुकीच्या अडथळ्याविना पार पडाव्यात यासाठी वाहतूक विभागाने शिळफाटा रस्त्यासह कल्याणमधील अंतर्गत रस्ते सोमवारी (दि. १४) दुपारी बारा ते रात्री बारा वाजेपर्यंत वाहतुकीसाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

हे रस्ते बंद राहणार असले तरी वाहन चालकांना पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. कल्याण शहरात शिळफाटा, अंबरनाथ, बदलापूरकडून येणारी जड, अवजड वाहनांची वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. वाहतूक विभागाचे पोलीस आयुक्त पंकज शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली कोळसेवाडी



वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन सांडभोर, डोंबिवली वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम पाटील, कल्याण वाहतूक विभागाचे रामचंद्र मोहिते यांनी बंद, पर्यायी रस्ते मार्गाचे नियोजन केले आहे.

शिळफाटा रस्त्यावरील कल्याण फाटा येथून (दत्तमंदिर)येथून कल्याण, डोंबिवली शहराकडे येणाऱ्या जड, अवजड वाहनांना कल्याण फाटा येथे प्रवेश बंद करण्यात येणार आहे. ही वाहने मुंब्रा बाह्यवळण रस्ता, खारेगाव, मुंबई नाशिक महामार्गाने पुढे जातील. नाशिक मुंबई राष्ट्रीय महामार्गाने रांजणोली वळण रस्ता दुर्गाडी किल्ला येथून कल्याणकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड, अवजड वाहनांना दुर्गाडी चौक येथे प्रवेश बंद करण्यात येणार आहे. ही वाहने सोमवारी रात्री १२ वाजल्यानंतर इच्छित स्थळी सोडण्यात येणार आहेत. कर्जत, बदलापूर, अंबरनाथ भागातून कल्याण शहरात येणाऱ्या जड, अवजड वाहनांना काटई-बदलापूर रस्त्यावरील नेवाळी नाका येथे प्रवेश बंद करण्यात येणार आहे.

### कल्याण पूर्व भाग बंद

कल्याण पूर्वेतील काटेमानिवली येथील ड प्रभाग कार्यालय येथे डॉ. आंबेडकर जयंतीचा उत्सव आणि मिरवणुका याठिकाणी येणार आहेत. सुमारे १५ हजार अनुयायी या उत्सवात सहभागी होणार आहेत. यासाठी उल्हासनगर भागातून कल्याण पूर्व कोळसेवाडी भागाकडे येणाऱ्या जड, अवजड, खासगी, एस. टी. बस यांना श्रीराम चौक येथे प्रवेश करण्यात येणार आहे. कल्याण पश्चिम, उल्हासनगर भागातून कल्याण पूर्वेत येणाऱ्या सर्व जड वाहनांना सम्राट चौक वालधुनी येथे प्रवेश बंद करण्यात येणार आहे. मलंग रस्ता, चक्कीनाका भागातून विठ्ठलवाडी, उल्हासनगरकडे जाणाऱ्या जड वाहनांना चक्कीनाका येथे प्रवेश बंद करण्यात येणार आहे.

## सधन लाभार्थ्यांनी अन्न सुरक्षा योजनेतून बाहेर पडून शासनाच्या मोहिमेस सहकार्य करावे

# पुरवठा विभागाकडून अपात्र शिधापत्रिका तपासणी मोहीम

◆ **शहापूर (वार्ताहर):**

राज्यात राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ ची अंमलबजावणी सुरू झालेली आहे. यानुसार अन्न नागरी पुरवठा विभागातील निर्देशानुसार व ठाणे जिल्हा पुरवठा व जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने शहापूर तहसीलदार परमेश्वर कासुळे यांच्या मार्गदर्शनाखाली व पुरवठा निरीक्षण अधिकारी अमृता सूर्यवंशी यांच्या देखरेखीखाली तहसील विभागातील पुरवठा शाखेकडून अपात्र शिधापत्रिका तपासणी मोहीम




राबविण्यात येत आहे.

तालुक्यातील अंत्योदय, प्राधान्य कुटुंब लाभार्थी (केशरी) व शुभ्र या सर्व प्रकारच्या शिधापत्रिकांची तपासणी करण्यासाठी दरवर्षी १ एप्रिल ते ३१ मे या कालावधीमध्ये शोध मोहीम राबविण्यात येत आहे. सदर, शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या निकषांतर्गत या शोध मोहिमेत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांच्या शिधापत्रिका धारकांकडून रास्त भाव धान्य दुकानदार यांच्या माध्यमातून विविध नमुन्यात तपासणी अर्ज भरून प्राप्त केले जात असल्याची माहिती पुरवठा निरीक्षण अधिकारी अमृता सूर्यवंशी यांनी दिली आहे.

दरम्यान, गरजू व पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळण्याकरिता सधन लाभार्थ्यांनी अन्न सुरक्षा योजनेतून बाहेर पडून शासनाच्या मोहिमेस सहकार्य करावे असे आवाहन पुरवठा विभागाकडून करण्यात आले असून या सर्व लाभार्थ्यांनी आपल्या रास्त भाव धान्य दुकानदार यांच्याकडील फॉर्म भरून माहिती सादर करावी व तसेच आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न केल्यास शिधापत्रिका रद्द केले जातील. तसेच नागरिकांनी वार्षिक कौटुंबिक उत्पन्नाबाबत चुकीची अथवा खोटी माहिती दिल्यास त्यांच्याविरुद्ध कारवाई केली जाईल व आवश्यक तिथे पोलीस विभागाची मदत घेतली जाणार असल्याचे सूर्यवंशी यांनी म्हटले आहे.

## मुरबाड श्रीराम मंदिरामध्ये ३०० लोकांची वैद्यकीय तपासणी

◆ **मुरबाड (वार्ताहर):**

मुरबाड येथील श्रीराम मंदिरामध्ये रविवारी दि. १३ एप्रिल रोजी ३०० लोकांची निशुल्क वैद्यकीय तपासणी करण्यात आली. अस्थिरोग, गुडघेदुखी, फ्रॅक्चर, मधुमेह, रक्तदाब, मणक्याचे विकार, मानदुखी, डोळ्यांचे विकार व मोतीबिंदूची चाचणी, बालरोगचिकित्सा, संधिवात रुग्णांची डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली. सायन रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. मोहन जोशी व मुरबाड येथील डॉ. हरिश्चंद्र पारधी आदींनी या शिबिरासाठी उपस्थितीत होते.



श्री हनुमान उपासक कै. डॉ. अच्युत उर्फ बाळ जोशी व कै. मालती जोशी यांच्या स्मरणार्थ हे शिबीर आयोजित करण्यात आले. डॉ. अश्विन जोशी, अस्थिरोग तज्ज्ञ, डॉ. नंदन मराठे, मणक्याचे शल्यचिकित्सक डॉ. आयुषी ठाकर फिजिशीयन मधुमेह, रक्तदाब, पोषण, वजन व्यवस्थापन तज्ज्ञ डॉ. अदिती जोशी व डॉ. अनुश्री भटकळ नेत्ररोग आणि रेटिना शल्यचिकित्सक, डॉ. वर्षील शाह बालरोग व लसीकरण तज्ज्ञ, डॉ. सोहम कोवे फिजिओथेरपिस्ट असे तज्ज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी करण्यासाठी उपस्थित होते. यावेळी रक्त चाचण्या व एक्स-रे सवलतीच्या दरात करण्यात आले. शिबिरासाठी साईनेप्स स्पाईन, दि मेडिकल हॉल - सायन, मुंबई आणि मुरबाड, श्री राम मंदिर ट्रस्ट, मुरबाड यांनी सहकार्य केले.

## महामानवाचे स्मरण

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती. १८९१ मध्ये ते जन्मले आणि १९५६ मध्ये वारले, पण या मधल्या काळात त्यांनी जगाला प्रचंड काही दिले. त्यांनी भारताला संविधान दिले. आज त्या संविधानाच्या बळावर तर काँग्रेससह अनेक विरोधी पक्ष उड्या मारत आहेत. पण आंबेडकर यांनी संविधानासारखी अद्‌भूत गोष्ट तर दिलीच, पण त्याशिवायही त्यांनी भारतावर एक उपकार केले आहेत. प्रत्येक भारतीयाने त्याचे कृतज्ञतापूर्व स्मरण केले पाहिजे. ती आहे ती म्हणजे त्यांनी देशाला मुस्लीम राष्ट्र होऊ दिले नाही. जेव्हा त्यांनी हिंदू म्हणून मरायचे नाही असे ठरवले तेव्हा अनेक धर्म त्यांच्या पुढे पदर पसरून तुम्ही आमचा धर्म स्वीकारा म्हणून स्वागतार्थ पायघड्या घातल्या होत्या. त्यात मुस्लीमही होते. पण बाबासाहेबांनी तसला अविचार केला नाही व बौद्ध धर्म स्वीकारला आणि देशाचे आज एक अनोखे रूप आपण पाहत आहोत. यामागे बाबासाहेबांचे विचार आणि त्यांची दूरदृष्टी आहे. बाबासाहेबांनी देशाला एक फार मोठी बाब दिली आहे ती म्हणजे या देशाची घटना. संविधानाच्या जोरावर आज जे राहुल गांधी आणि तमाम काँग्रेसजन उड्या मारत आहेत त्यांना बाबासाहेबांनी ही भेट दिली आहे. तिचा दुरुपयोग कसा केला हे आपण पाहातच आहोत. पण बाबासाहेबांनी या देशाला संविधान रूपी शस्त्र देऊन तमाम भारतीयांना फार मोठे साधन दिले आहे. बाबासाहेबांनी भारतावर अनेक प्रकारे उपकार केले आहेत त्यापैकी एक आहे ती म्हणजे त्यांनी जीवनभर वंचित आणि शोषितांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या उत्थानासाठी संघर्ष केला. त्यांनी त्यासाठी समाजातील शोषित आणि वंचित अशा दलित समाजातील वर्गात जागृती केली आणि भारतीय संविधान तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

हिंदू म्हणून जन्मलो असलो तरीही हिंदू म्हणून मरणार नाही हे वाक्य त्यांनी तंतोतंत पाळले आणि बौद्ध धर्म स्वीकारला आणि त्यांच्यासमवेत त्यांच्या लाखो अनुयायांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. १४ ऑक्टोबर १९५६ या दिवशी त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला आणि त्यांच्यासमवेत तीन लाख ६५ हजार अनुयायांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. हिंदू धर्मात जात्यंधता आणि इतर अनेक दुर्गुण होते त्यामुळे बाबासाहेबांना धर्म बदलावा लागला पण त्यांचा धर्मपरिवर्तनाचा निर्णय १९३६ मध्येच झाला होता असे इतिहास सांगतो. दलितांच्या उत्थानात हिंदू असणे हा मोठा अडसर आहे असे त्यांचे मत होते. हिंदू धर्माची जातीयता आणि जातीची उतरंड त्यांना न पटणारी होती आणि त्यामुळे त्यांनी हिंदू धर्म सोडण्याचा निर्णय घेतला. पण त्यांना अन्य कोणताही धर्म स्वीकारावा वाटला नाही हे त्यांचे मोठेपण होते. आपण त्याच्याबद्दलल बोलताना त्यांचे हे मोठेपण कधीच मान्य करत नाही. त्यांचे बौद्ध धर्मात प्रवेश करणे ही हिंदूंची जातीव्यवस्था नाकारण्याची प्रतिक्रियात्मक आणि लाक्षणिक कृती होती आणि त्यांनी समानतेच्या प्रति असलेली कटिबद्धतेशी सुसंगत होती. त्यामुळे त्यांच्या या कृतीकडे केवळ धर्मपरिवर्तन म्हणून न पहाता हिंदू धर्मातील दोष काढून टाकण्याच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. बाबासाहेबांनी लाखो दलितांच्या लेकरांना स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव करून दिली आणि एक प्रकारचे आत्मभान दिले असे म्हणावे लागेल. बाबासाहेब विद्वान तर होतेच. त्यांनी त्यांचे ग्रंथालय अद्ययावत अशा ग्रंथांनी सुसज्ज केले होते आणि त्यांचे परिशीलन त्यांनी आयुष्यभर केले. त्यांनी सतत समानतेसाठी आणि समाजातील जातीभेद दूर करण्यासाठी काम केले त्याला तोड नाही. आज त्यांची गरज प्रकर्षाने जाणवते आहे कारण आज समाजात जातिभेद प्रचंड प्रमाणात फोफावला आहे आणि उच्चनीच भेद प्रचंड प्रमाणात वाढले आहेत. त्यामुळे आज तर बाबासाहेबांची गरज तर जास्तच जाणवते आहे.

बाबासाहेबांनी धर्म परिवर्तन केवळ हौस किंवा लहर म्हणून केले नाही तर त्यामागे संयुक्तिक कारण, नैतिकता आणि न्याय ही तत्वे होती. याच तत्वांसाठी त्यांनी आयुष्यभर काम केले आणि संघर्ष केला. बाबासाहेबांनी समाजातील जातीयता नष्ट करण्यासाठी चवदार तळ्याचा सत्याग्रह केला आणि ती भूमी आज परमपवित्र भूमी म्हणून महाडमध्ये गणली जाते. दलित समाजाच्या व्यक्तीना माणूस म्हणून दर्जा मिळवून देणे आणि त्यांचा आत्मसन्मान वाढवणे हे त्यांच्या या कार्याचा लसावि होता असे म्हणावे लागेल. आपल्या पुस्तकात अनिहिलेशन ऑफ कास्ट या पुस्तकात त्यांनी हिंदू धर्मातील जातीव्यवस्थेवर कोरडे ओढले आहेत. बाबासाहेबांनी बौद्ध धर्मात प्रवेश का केला यावर आजही चर्चा होत असतात. पण काही विद्वानांच्या मते त्यांनी आकसाने बौद्ध धर्मात प्रवेश केलेला नाही, तर त्यांनी हिंदू धर्माला सुधारण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण त्यांन त्यात यश आले नाही असे म्हणून ठेवले आहे. या महामानवाला वंदन करण्यामागे त्यांचे केवळ बौद्ध धर्म स्वीकारणे हेच एक कार्य नव्हते तर त्यांनी अनेक दिग्गज हिंदू नेत्यांशी चर्चाही केली होती. त्यात सावरकर होते तसेच टिळकांचा मुलगाही होता. त्यामागे बाबासाहेबांनी आकसाने बौद्ध धर्म स्वीकारला असे म्हणणे चूक आहे. त्यांनी राजकारण केले आणि पहिले ते देशाचे कायदामंत्री होते. त्यांनी समाजाचे प्रबोधन केले आणि हिंदू धर्मावर कोरडे ओढले. पण हिंदू धर्मामुळे त्यांचे कधीही समाधान झाले नाही आणि शेवटी त्यानी हिंदू धर्म सोडण्याचा निर्णय घेतला. बाबासाहेब आजही महत्त्वाचे आहेत कारण त्यांनी जी शिकवण दिली आहे तिची आज गरज कधी नव्हे ती जास्त आहे. ६५ वर्षांच्या आयुष्यात बाबासाहेबांनी दलितांना आत्मसन्मान दिला आणि त्यांना शिकले तरच त्यांचा टिकाव लागेल हे तत्त्व शिकवले. त्यानी राखीव मतदारसंघांचा आग्रह धरला आणि त्यासाठी महात्मा गांधी आणि आंबेडकर यांच्यात करारही झाला. पण काँग्रेसने तो करार उधळून लावला आणि काँग्रेसने कधीही दलिताना बरोबरचे स्थान दिले नाही. केवळ भाषा मात्र त्यांच्या कल्याणाची करायची आणि पंगतीत त्याचा अपमान करायचा हे शेतकरी नेते नारायण नागू पाटील यांनी आपल्या पुस्तकात लिहून ठेवले आहे. आपल्या ६५ वर्षांच्या काळात आभाळाएवढे कार्य करणाऱ्या बाबासाहेबांना त्रिवार वंदन.

# स्वप्ने मोठी, प्रयत्न तोकडे...

**उद्या १५ एप्रिल रोजी महाराष्ट्रात स्थापन झालेल्या भाजपा-शिवसेना आणि राष्ट्रवादी या महायुतीच्या सरकारला शंभर दिवस पूर्ण होत आहेत. या सरकारचे कॅप्टन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे गेले काही दिवस महायुती सरकारच्या १०० दिवसांच्या कामकाजाचा लेखाजोखा प्रत्येक खात्याकडून घेत आहेत. सर्वसाधारणपणे मुख्यमंत्र्यांनी प्रत्येक विभागाला शंभर दिवसांच्या कामकाजाचे नियोजन करण्याचे जे एक विशिष्ट टार्गेट दिले होते त्यापैकी जवळपास बहुतांश विभागांनी ७० ते ७५ टक्के उद्दिष्ट कृती केली आहे. तसेच या शंभर दिवसांत निश्चित करण्यात आलेली तथापि विविध अडचणींमुळे ती पूर्णत्वास नेता येऊ न शकलेली कामे हीदेखील येत्या महिन्याभरात पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी संबंधित खात्यांना दिले आहेत.**



**सुनील जावडेकर**

गेले वर्ष हे लोकसभा आणि त्यानंतरच्या विधानसभा निवडणुकांचे वर्ष असल्यामुळे राज्य सरकारला लोकप्रिय योजनांवर भरमसाठ खर्च करावा लागला. लोकसभा निवडणुकीत महायुतीला जो फटका बसला होता तो विधानसभा निवडणुकीमध्ये भरून काढण्यासाठी जर या लोकप्रिय योजना तत्कालीन राज्य सरकारने अमलात आणल्या नसत्या, तर विधानसभा निवडणुकीतही लोकसभा निवडणुकीची पुनरावृत्ती झाली असती. मुळात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना हे मध्य प्रदेशमध्ये भाजपा सरकारने याआधीच लागू केली होती आणि त्याची यशस्वी अंमलबजावणी देखील केली होती. महाराष्ट्रातही महाविकास आघाडीला लोकसभा निवडणुकीत मिळालेले मोठे यश लक्षात घेऊन महायुती समोर लोकप्रिय योजना जाहीर करून त्याची अंमलबजावणी करण्यात येईल अन्य दुसरा कोणताही पर्याय नव्हता. त्यामुळेच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना अशा विविध लोकप्रिय योजना तत्कालीन महायुती सरकारला आणाव्या लागल्या.

या लोकप्रिय योजनांमुळेच महाराष्ट्रात पुन्हा एकदा भाजपा-शिवसेना राष्ट्रवादी यांच्या महायुतीला अभूतपूर्व यश मिळाले हे देखील मान्य करावे लागते. अर्थात निवडणुका संपल्यानंतर जेव्हा कोणत्याही सरकारला राज्याचा कारभार चालवायचा असतो आणि तो देखील तीन पक्षांचा मिळून चालवायचा असतो अशा वेळेला निवडणुकीच्या काळात केल्या गेलेल्या घोषणा आणि त्यानंतर त्याची करावी लागणारी अंमलबजावणी यांचा सरकारची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन योग्य तो ताळमेळ राखणे यामध्ये राज्य सरकारची खरी कसोटी लागत असते. राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिलेल्या माहितीनुसार दरवर्षी साधारणपणे महाराष्ट्रातील अडीच कोटी लाडक्या बहिणींसाठी राज्य सरकारला जवळपास ४६ हजार कोटी रुपये खर्चाचा बोजा पडणार आहे. राज्याच्या महिला व बालविकास या खात्यामार्फत लाडकी बहीण योजना महाराष्ट्रात सर्वत्र राबवण्यात येते. कुमारी आदिती तटकरे या खात्याच्या मंत्री आहेत आणि दर महिन्याला महाराष्ट्रातील अडीच कोटी लाडक्या बहिणीच्या खात्यात दीड हजार रुपये कधी जमा होणार हे सांगण्याचे एकमेव काम आदिती तटकरे यांना करावे लागत आहे.

राज्य सरकार मधल्या एका खात्याची अशी स्थिती असताना दुसरीकडे महाराष्ट्रातल्या खेडोपाडी जी हक्काची आणि परंपरागत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था कार्यरत आहे त्या एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना महिनाभर राब राब राबून देखील महिन्याच्या अखेरीस ५०% पगार हाती पडत आहे. उर्वरित पगार एसटी कर्मचाऱ्यांना मिळण्यासाठी खात्याचे मंत्री प्रताप सरनाईक हे मंत्रालयात संबंधित सचिवाकडे जाऊन कर्मचाऱ्यांना उर्वरित ५० टक्के पगार तातडीने द्यावा यासाठी विनवण्या करत आहेत असे चित्र आहे.

अखेरीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित खात्याशी बोलून एसटी कर्मचाऱ्यांना त्यांचा पूर्ण पगार देण्यासाठी निधीची उपलब्धता करून घेतली. राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांची स्थिती हे अत्यंत दयनीय आहे. गोरगरीब जनतेला हक्काचे असणारी ही लाल परी सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे आणि एसटी महामंडळातील यापूर्वीच्या अनागोंदी आणि अंधाधुंद कारभारामुळे आर्थिक संकटात आहे. कर्मचाऱ्यांचे पगार देण्यासाठी देखील एसटी महामंडळाला राज्य सरकारच्या मदतीवर अवलंबून राहावे लागते. कर्मचाऱ्यांचे मासिक पगार देण्यासाठीच पैसे नसल्यामुळे त्यांच्या भविष्य निर्वाह निधीचा हप्ता कर्मचाऱ्यांच्याकडून कापला तर जातो मात्र तो भरला जात नाही. त्यामुळे सरकारला खरोखरच काही मोठे काम करायचे असेल, तर सर्वात आधी जे कर्मचारी महिनाभर राबून आपली सेवा देतात त्या कर्मचाऱ्यांना किमान त्यांच्या हक्काचा नियमित पगार तरी वेळेवर दिला जावा एवढीच माफक अपेक्षा एसटी कर्मचाऱ्यांची आहे.

राज्याच्या तिजोरीवर लोकप्रिय योजनांचा भेटणारा ताण लक्षात घेता आणि त्या योजना तडकाफडकी गुंडाळणे हे देखील सरकारला शक्य नसल्याचे दिसत असल्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वच विभागांना काटकसरीचे सूत्र लागू केले आहे. एकनाथ शिंदे यांच्या सरकारच्या काळात सरकारी बाबूंनी जी काही चौफेर उधळपट्टी केली त्या उधळपट्टीला वेसण घालण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करत आहेत. अर्थात हे करत असताना महायुती सरकारने राज्यातील शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री बळीराजा सवलत वीज योजना ही देखील सुरूच ठेवली आहे. पंतप्रधान सूर्य घर योजनेच्या माध्यमातून सौर ऊर्जेद्वारे महाराष्ट्रातील अधिकाधिक घरकुले सौर ऊर्जेने जोडण्याचा राज्य सरकारचा एक महत्त्वकांक्षी प्रकल्प आहे. याबाबत आजच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्धा येथील कार्यक्रमात राज्यातील ३०० युनिट पेक्षा कमी ज्या मध्यमवर्गीय विज ग्राहकांचा वीज वापर आहे, अशा सर्व ग्राहकांना पंतप्रधान सूर्य घर योजनेत आणि राज्य सरकारच्या या संबंधित योजनेत समाविष्ट करून मोफत वीजपुरवठा करण्याची राज्य सरकारची संकल्पना असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले आहे. सर्वसामान्य जनतेसाठी हे निश्चितच मोठी दिलासा देणारी गोष्ट आहे. राज्यातील महायुती सरकार अत्यंत भक्कमपणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली निश्चितच काम करत आहे. तथापि या सरकारला आणि या सरकारमधील प्रशासनाला अधिक गती मिळण्याची नितांत गरज आहे.

# बेस्ट उपक्रमाची व्यथा



**आज बेस्टला गरज आहे ती आर्थिक मदतीची. तीही थोडी नव्हे, तर अंदाजे दोन हजार ते तीन हजार करोड रुपये मदतीची. आज सरकार मुंबईतील रेल्वे, नवनवीन मेट्रो सेवा, वॉटर टॅक्सी, सी प्लेन सेवा, समुद्रमार्ग उड्डाणपूल यासाठी मोठमोठी आर्थिक तरतूद करत आहे मात्र मुंबईची कणा असलेली बेस्ट सेवा त्याकडे मात्र अक्षरशः दुर्लक्ष केले जात आहे.**

**मुंबई डॉट कॉम**

**अल्पेश म्हात्रे**

मुंबईत कितीही नवनवीन वाहतूक सेवा निर्माण झाल्या तरी त्यासाठी पूरक सेवा म्हणून बेस्टला पर्याय निर्माण होणार नाही आजही सवलतीच्या दरातील तिकीट असल्यामुळे व कमी दरात फायदेशीर सेवा मिळाल्याने आजही नागरिकांचा ओढा हा बेस्ट बस सेवेकडेच असतो. मात्र तिला वेळीच मदत करून सावरले नाही, तर ती असताना जाण्यास वेळ लागणार नाही आणि परिणामी भरडला जाईल तो सामान्य नागरिकच. आज बेस्टसमोर अनेक समस्या आवासून उभ्या आहेत त्यात कमी झालेला बसताफा व वाढत गेलेला कंत्राटदारांचा बसताफा आजही कामगार संघटनेंबरोबर केलेल्या कराराप्रमाणे बेस्टला स्व-मालकीचा ३ हजार ३३७ बस गाड्यांचा ताफा स्वतःचा राखणे आवश्यक आहे, मात्र आज ८०० बस गाड्यांपर्यंत बेस्टचा स्वतःचा बसताफा घसरला आहे. जर स्वतःचा बसतफा वाढवायचा असेल तर बेस्टला मोठी आर्थिक गुंतवणूक करावी लागणार आहे. त्यातली बस गाड्यांची व इतर गोष्टींचे वाढलेले दर पाहता तसेच केंद्र सरकारने सीएनजी व डिझेल बस गाड्या सरकारी खात्यात खरेदींना मनाई केल्याच्या पार्श्वभूमीवर बेस्टच्या अडचणीत आणखी वाढ होणार आहे. त्यामुळे महागड्या विद्युत बस गड्या घेणे बेस्टला आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. एकीकडे आर्थिक कोंडी व दुसरीकडे सरकारी नियमात बेस्ट अडकली आहे त्यात आता बेस्टकडे कर्मचारी राहिलेले नाही आज एक अधिकारी तीन-तीन बस आगार सांभाळत आहेत.

बेस्टमध्ये वाहतूक विभागात अधिकाऱ्यांची संख्या ही आता दिवस आणि दिवस घटत चालली आहे त्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांवर प्रचंड प्रमाणात ताण येत आहे उद्या तेही निवृत्त झाल्यानंतर बेस्ट कर्मचारी व अधिकाऱ्यांचे काय होणार हा प्रश्न अनुत्तरितच आहे. निदान कंत्राटदारांच्या बस गाड्या वर कंत्राटदारांचे चालक-वाहक असले तरी त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तरी बेस्टचे अधिकारी लागणार मात्र चांगले अनुभवी अधिकारी नसल्याने पुढे भविष्यात बेस्टच्या पुढे काय वाढून ठेवले आहे याचा कोणालाही थांग पत्ता नाही. रस्त्यावरील वाहतुकी कोंडीने बस वाहतूक संथ झाली आहे अशाने बस गाड्या अपेक्षित फेऱ्या पूर्ण करू शकत नाही आणि वाहतूक कोंडीत बस अडकल्याने बेस्टला मोठा तोटा सहन करावा लागत आहे त्याचा परिणामही बस प्रवाशांवर झाला आहे. बेस्टच्या विद्युत विभागातही फार काही आलंबेल नाही. विद्युत पुरवठ्यातील नफ्यामध्ये दिवसेंदिवस घट होत चालली आहे त्यात बाजारात विद्युत विभागात स्पर्धक निर्माण झाल्याने बेस्टच्या विकासात अडथळे निर्माण झाले आहे त्यात विद्युत विभागात कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याने चांगली सेवा देता येणे शक्य होत नाही. त्यामुळे ग्राहक इतर कंपन्यांकडे आकर्षित होत आहेत. बेस्ट उपक्रमाचा अर्थसंकल्प मुंबई महापालिकेच्या अर्थसंकल्पात विलीन करणे हा एक बरेच दिवसांपासून अडकून राहिलेला प्रश्न होता २०१७ साली मुंबई महापालिकेने मंजूर करून तो नगरपालिका खात्याकडे पाठवला होता मात्र त्यावर अजूनही कोणतीच कारवाई झाली नाही हे विलीनीकरण करण्यात बऱ्याच तांत्रिक अडचणी आहेत त्या पूर्ण झाल्या, तर बेस्टला तोट्यातून थोडाफार बाहेर पडण्यास वाव निर्माण होईल. राहता राहिला प्रश्न तो बेस्टला गरज असलेल्या एका सक्षम महाव्यवस्थापकाचा. आज एवढा मोठा डोलारा असलेल्या बेस्टला सक्षम महाव्यवस्थापक नाही. कोणी आज बेस्ट मध्ये काम करण्यास तयार होत नाही. वास्तविक पाहता मुंबई शहराची परिवहन संस्था चालवणे हे येड्या गबाळ्याचे काम नाही तर त्यासाठी हवा आत्मीयतेने काम करणारा व्यवस्थापक. आज मुंबई महापालिकेत निवडणुका नाही त्यामुळे नगरसेवक नाही त्यामुळे बेस्ट समिती नाही त्यामुळे आज अधिकाऱ्यांच्या हातात असलेला संपूर्ण कारभार त्यामुळे सर्वांचेच झालेले दुर्लक्ष ही बेस्टच्या मुळाशी उठत आहे निदान एक सक्षम महाव्यवस्थाक बेस्टला तारू शकेल.

गेले एक दोन वर्षे असंख्य महाव्यवस्थापक झाले मात्र कोणालाही काडीचाही बेस्टमध्ये रस नसल्याने त्यांनी त्वरित बदली करून घेण्यात ते यशस्वी ठरले त्यामुळे पूर्ण वेळ महाव्यवस्थापकाची आज बेस्ट उपक्रमाला गरज आहे. आता तरी सरकारने याकडे लक्ष द्यावे व बेस्ट कर्मचाऱ्यांसोबतच मुंबईकर प्रवाशांना भविष्यात एका चांगल्या सेवेपासून वंचित ठेवू नये हीच अपेक्षा.

## राशिभविष्य

**सोमवार, १४ एप्रिल २०२५**

### ॥ पंचांग ॥

चंद्र नक्षत्र पूर्वा. योग वृद्धि. चंद्र राशी सिंह. भारतीय सौर २४ चैत्र शके १९४७ सोमवार दि. १४ एप्रिल २०२५. मुंबईचा सूर्योदय ६.२२ मुंबईचा चंद्रोदय ४.४७, मुंबईचा सूर्यास्त ५.५२ मुंबईचा चंद्रास्त ५.२२ उद्याची. राहू काळ २.१३ ते ३.४७. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती, वैशाखी, शुभ दिवस.

### ॥ भविष्य ॥

**मेष** : व्यवसायधंद्यात नवीन गुंतवणूक करता येईल.

**वृषभ** : आपल्या कार्यामुळे इतरांवर त्याचा प्रभाव पडेल.

**मिथुन** : जीवनसाथीची साथ मिळेल.

**कर्क** : आपल्या आरोग्याकडे लक्ष द्या.

**सिंह** : आजचा दिवस उत्साही राहील आर्थिक बाबतीमध्ये उत्तम दिवस.

**कन्या** : शुभवार्ता मिळतील अनावश्यक खर्च टाळा.

**तूळ** : कुटुंबातील तरुण-तरुणींचे प्रश्न संपुष्टात येतील.

**वृश्चिक** : काही वेळेस मनाविरुद्ध करणे स्वीकारावे लागण्याची शक्यता.

**धनू** : शैक्षणिक बाबतीत आजचा दिवस यशदायी ठरेल.

**मकर** : कामाची कार्य व्याप्ती वाढल्यामुळे धावपळ होईल.

**कुंभ** : विद्यार्थ्यांना अपेक्षित यश मिळेल.

**मीन** : वाहने जपून चालवा; वेगावरती नियंत्रण हवे.

## जनसंवाद

### आजचे मरण टळले, उद्याचे काय ?

एसटी महामंडळाकडून एसटी कर्मचाऱ्यांना या महिन्यात ५६ टक्के पगार मिळाल्यानंतर राज्यात एसटी कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण तयार झाले. विरोधी पक्षानी महायुती सरकारवर टीकेची झोड उठवली. त्याची दखल घेऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेनी वित्त विभागाशी बोलणी करून येत्या मंगळवारपर्यंत उर्वरित पगार देण्याची घोषणा केली. पण यामूळे हा प्रश्न कायमचा कसा सुटणार? एसटी महामंडळ जर आर्थिक दृष्ट्या सक्षम असते तर ५६ टक्के पगार देण्याची वेळ का यावी? एसटीची आर्थिक परिस्थिति बिकट असल्यामुळेच आजचे मरण टळले पण उद्या काय होणार? सगळी सोंगे घेता येतात पण पैशांचे सोंग घेता येत नाही हेच खरे.

**-अरुण पां. खटावकर,** लालबाग

### अष्टविनायक मंदिरांतील ड्रेसकोड स्वागतार्ह !

मुंबईतील श्री सिद्धिविनायक मंदिरात ड्रेसकोड लागू झाल्यानंतर आता राज्यातील अष्टविनायक मंदिरांतही ड्रेसकोड लागू करण्यात आला आहे. मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी कोणते कपडे परिधान करून यावेत आणि कोणते कपडे परिधान करून मंदिरात प्रवेश निषिद्ध असेल याची सूचिच या मंदिरांच्या बाहेर लावली जाणार आहे. मंदिरातील सात्विकता अबाधित राहावी यासाठी मंदिर समित्यांनी घेतलेला हा निर्णय नक्कीच स्वागतार्ह आहे. गेल्या ३-४ वर्षांत राज्यातील अनेक सुप्रसिद्ध मंदिरांत ड्रेसकोड लागू करण्यात आले आहेत. याचे श्रेय हिंदू जनजागृती समिती आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाला द्यावे लागेल. गेल्या काही वर्षांत त्यांनी राज्यातील मंदिरांच्या विश्वस्तांचे तसेच पुजाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात संघटन घडवून आणले. राज्यातील समस्त मंदिरांत भक्तांच्या सुविधेसाठी आणि मंदिराचे पावित्र्य अबाधित राहावे यासाठी काय काय करता येईल याविषयी चर्चा घडवून आणण्यासाठी आणि राज्यस्तरावर ध्येय धोरणे आखण्यासाठी अधिवेशने आणि शिबिरे यांचे आयोजन केले. ज्याची फलश्रुती आज विविध मंदिरांत दिसून येत आहे. आजवर या देशावर अनेक आक्रमकांनी हल्ले करून येथील वैभव लुटून नेले मात्र येथील संस्कृतीच्या खुणा त्यांना मिटवता आल्या नाही. या खुणा आणि त्यांचे पावित्र्य जतन करून ठेवण्यासाठी आपल्या पूर्वजांनी मोठे योगदान दिले आहे, त्यामुळे ते पावित्र्य टिकवून ठेवण्याचे दायित्व आता आपल्या खांद्यावर आहे. महाराष्ट्रात जेव्हा मंदिरांतून वस्त्रसंहिता लागू करण्याचा प्रस्ताव मांडला गेला तेव्हा समाजातून जसे या भूमिकेचे स्वागत झाले तसा यास काही पुरोगामी मंडळींकडून विरोधही करण्यात आला. तरीही मागील दोन वर्षांत राज्यातील अनेक मंदिरांनी ड्रेसकोड लागू केले आहेत.

**- जगन घाणेकर,** घाटकोपर

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता !

विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आज १३४ वी जयंती. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन! जागतिक कीर्तीचे विचारवंत अशी ओळख आलेल्या विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्य प्रदेशातील महू या गावी झाला. आधुनिक भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारे विचारवंत म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकरांची जगभर ओळख आहे मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ज्या जाहिराती किंवा शुभेच्छा संदेश दिल्या जातात त्यात डॉ बाबासाहेब आंबेडकरांची ओळख दलितांचे उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार अशीच करून दिली जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलीत उद्धाराचे कार्य तर जगजाहीर आहे. जगाला हेवा वाटेल अशी राज्यघटना त्यांनी देशाला दिली. त्यांनी दिलेल्या राज्यघटनेमुळेच विविध जाती, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती असलेला आपला देश एकसंघपणे बांधला गेला आहे. थोर अर्थतज्ज्ञ, महिलांचे उद्धारक, कृषी तज्ज्ञ, शिक्षण तज्ज्ञ, जलतज्ज्ञ इतिहास तज्ज्ञ, समाज शास्त्रज्ञ, कायदेपंडित, धर्म चिकित्सक, राजनीती तज्ज्ञ, कामगार नेते, शांतीचे उपासक, कलाप्रेमी, लेखक, पत्रकार असे विविध पैलू डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हे विविध पैलू कायम दुर्लक्षित केले जातात म्हणूनच मी माझ्या महिलांचे उद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जलविषक धोरण या मागील दोन लेखात डॉ. बाबसाहेब आंबेडकरांनी महिलांसाठी केलेले कार्य आणि जलतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन पैलूंची ओळख करून दिली होती.

**- श्याम ठाणेदार,** दौंड

### राज्यपालांपाठोपाठ राष्ट्रपतींवरही 'वेळेचे' बंधन

राज्यपाल, राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री, लोकसभा अध्यक्ष, राज्यसभा सभापती ही घटनात्मक दृष्टीने लोकशाही व्यवस्थेत अतिशय महत्त्वाची पदे आहेत त्यामुळेच त्यांना विशेष अधिकार आहेत मात्र या अधिकारांचा वापर मनमानीपणे करता येणार नाही याची जाणीव सर्वोच्च न्यायालयाने करून दिली आहे. वास्तविक राज्यपाल, राष्ट्रपती यांना अशी जाणीव करून द्यावी लागणे हे अतिशय दुर्दैवी आहे. तामिळनाडूचे राज्यपाल यांनी तामीळनाडू सरकारने मंजुरी साठी पाठवलेली अनेक विधेयके अडवुन ठेवली त्यातील काही राष्ट्रपतींकडे पाठवली होती. घटनेच्या कलम २०१ प्रमाणे राष्ट्रपतींना तर कलम २०० अनुसार राज्यपालांना निर्णय घेण्याबाबत वेळेची मर्यादा घालून दिली नसली तरी योग्य वेळत निर्णय घ्यावा हे अपेक्षित आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून राजकारण आणि सत्ताकारणाच्या अतिरेकापायी या पदांचा सदुपयोगापेक्षा दुरुपयोगच अधिक होत आहे म्हणूनच आता न्यायव्यवस्थेला पुढे येऊन राज्यपालांना तसेच राष्ट्रपतींना वेळेचे बंधन घालुन द्यावे लागेल आहे. राज्यपाल किंवा राष्ट्रपती यांनी आपल्या कडे आलेल्या विधेयकांबाबत काय तो निर्णय तीन महिन्यांत घ्यावा असे सर्वोच्च न्यायालयाने आदेशच दिले आहे. केंद्र आणि राज्य सरकार यामधील दुवा म्हणून राज्यपालांचे भुमिका महत्त्वाची ठरते. राज्याचे निर्णय घेण्याचा अधिकार हा राज्यातील लोकनियुक्त सरकारने घ्यायचे आणि मंत्रीमंडळाच्या सल्ल्यानुसार राज्यपालांनी राज्यांच्या हितासाठी काम करायचे. राज्यपाल पदाला घटनात्मक अधिकार, संरक्षण देखील आहेत, अगदी न्यायालय देखील राज्यपालांना आदेश देऊ शकत नाही मात्र राज्यपालांच्या निर्णयाची चिकित्सा करु शकते.

**-अनंत बोरसे,** शहापूर

### राष्ट्रीय संस्कृतीचा अवमान करणाऱ्यांना कठोर शिक्षा

यूट्यूब या माध्यमातून एक व्हीडिओ सर्वत्र पसरत आहे. त्यात न्यूझीलंड या देशातील एक युट्युबर सिंहगडावर फिरण्यासाठी आला होता. तो फिरता फिरता त्याला काही मुले भेटली ती मुले त्या युट्युबरला अशल्याघ शिव्या घालून भाषेचा वापर करून त्याची टेर उडवीत आहेत. यावरून आपणच आपल्या देशाचे वैरी आहोत, हे अजून एकदा ह्या मुलांनी सिद्ध केले. राष्ट्रीय संस्कृती नव्हे तर अस्मितेचा गळा घोटण्याचा हा प्रकार आहे. इतर देशातील लोकांसमोर आपण काय पायंडा घालतोय; याचा साधा मागमूस ही ह्या मुलांना नाही आहे. अश्या मुलांना कठोर शिक्षा दिली पाहिजे तरच इतर मुले असे करण्यासाठी धजणार नाही, यात तिळमात्र शंका नाही. नैतिकतेने वागण्यासाठी धर्मशिक्षण देणे आणि शालेय जीवना पासूनच राष्ट्रप्रेम शिकवायला हवे. तरच आदर्श पिढी निर्माण होईल.

**- आल्हाद माळगांवकर,** पनवेल

### नाना शंकरशेठ इंग्रजांना कळले, भारतीयांना कधी कळणार!

इंग्रज राजवटीतील मराठी उद्योजक जगन्नाथ नाना (शंकरशेठ) यांनी मुंबई ते ठाणे रेल्वे सुरू करावी म्हणून इंग्रज सरकारकडे आग्रह धरला.नाना शंकरशेठ यांनी कंपनी स्थापन करून संचालक झाले. रेल्वेचे कार्यालय सुरू करण्यासाठी आपल्या राजवाड्यात आपली जागा दिली. १६ एप्रिल १८५३ रोजी देशात मुंबई ते ठाणे रेल्वे सुरू झाली त्यावेळी नाना शंकररशेठ पहिल्या प्रवासात पहिले मान्यवर प्रवासी होते.रेल्वे मंत्रालय तो दिवस 'रेल्वे दिन' म्हणून साजरा करते. इंग्रज सरकारने नानांच्या योगदानाची दखल घेऊन मुंबई येथील मध्य रेल्वे मुख्यालय इमारतीच्या दर्शनी भागावर नानांचा अर्ध पुतळा कोरला आहे. म्हणूनच त्यांना भारतीय रेल्वेचे जनक संबोधले जाते. देशातील, महाराष्ट्रातील, मुंबईतील रेल्वे प्रवाशांनी १७२ वर्षांनंतर नानांचे नाव मुंबई सेंट्रल टर्मिनसला देऊन त्यांच्या स्मृती चिरंतन राहाव्यात म्हणून मागणी केली आहे. महाराष्ट्रातील मराठी नाना प्रेमी जनता गेली २६ वर्षे सरकारनेच लक्ष वेधून घेत आहे.१२ मार्च २०२० रोजी महाराष्ट्र सरकारने नाना शंकरशेठ यांचे नाव पश्चिम रेल्वेमार्गावरील मुंबई सेंट्रल टर्मिनसला देण्याचा प्रस्ताव मंजूर करून तो केंद्र सरकारकडे पाठवला त्याला पाच वर्षे झाली. मोदी सरकार पुन्हा सत्तेवर आले. मुंबईतील ओशिवरा - राम मंदिर, एल्फिन्स्टन- प्रभादेवी,कूर्ला-टिळक टर्मिनस नामकरण झाले.मराठी दानशूर नाना शंकरशेठ यांचे योगदान भारतीय सरकारला कधी कळेल ?

**- महादेव गोळवसकर,** कुर्ला

# संगणमताने कोट्यवधीची माती !

## बोंबला | रस्त्याचे अतिशय निकृष्ट

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील पिसेगावब, गांजपूर, उंदरी, आडस रस्त्यासाठी दहा वर्षाच्या प्रतीक्षा नंतर मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून पाच कोटी ९८ लक्ष ६२ हजार रुपयांच्या रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळाली असून मात्र हे काम चांगलं न करता गुत्तेदार व अधिकारी यांच्या संगनमताने या रस्त्याच्या कामांमध्ये काळी माती टाकून करत असल्याचं समोर आला आहे. एकीकडे शासन ग्रामीण भागातील लोकांना दळणवळणासाठी गैरसोय होऊ नये यासाठी कोट्यावधी रुपये खर्च करून दळणवळणासाठी रस्ते चांगले करण्याचे काम करत आहे सर त्या कामाच्या पैशाबर अधिकारी व गुत्तेदार भ्रष्टाचार करून स्वतःचे घर भरण्याचं काम करत आहेत पिसेगाव उंदरी रस्त्यावर जे काही काळी माती टाकून बोगस काम करीत होते ते काही जागरूक ग्रामस्थांनी रोखले व टाकलेल्या काळ्या मातीचे फोटो काढून इंजिनियर यांना माहिती दिल्यानंतर त्यांनी मी कामावर येऊन बघतो असं ग्रामस्थांना आश्वासित केलं मात्र या कामातील इंजिनिअर व गुत्तेदार यांच्यावर काम बोगस करीत असतील तर चौकशी करून कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थ करीत आहे.बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बैठकीमध्ये सर्व अधिकाऱ्यांना व कुत्तेदारांना चांगले काम करण्याच्या सूचना दिले आहेत मात्र त्यांना कोणीच मोजत नसल्याचे दिसून येत आहे. कोट्यावधी रुपयांची कामे हे बोगस करून अधिकारी व गुत्तेदार स्वतःची घर भरण्याचे काम करत आहेत याकडे जिल्हाधिकारी व सीईओ यांनी लक्ष देऊन चौकशी करून बोगस काम करणाऱ्या अधिकारी व गुत्तेदारावर कार्यवाही करून त्यांचे लायसन काळे यादीत टाकण्यात याचे आधीच ग्रामीण भागामध्ये रस्त्यांचे काम लबकर होत नाहीत अशातच पिसेगाव उंदी आडस रस्त्याला दहा वर्षांनंतर नवीन कामाची सुरुवात झालेली आहे या रस्त्यावरून आठ ते दहा गावांचे नागरिक दळणवळणासाठी रस्त्याचा वापर करीत आहेत त्यामुळे पालकमंत्री अजित दादा यांनी अशा गुत्तेदार व इंजिनियर अधिकाऱ्यांवर चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुशील नेहरकर व इतर ग्रामस्थ करत आहेत.



इंजिनीयर मते साहेब यांना मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून चालू असलेल्या पिसेगाव, उंदरी, आडस रस्त्यावर खडी डांबर टाकण्याऐवजी काळी माती टाकली जात आहे या संदर्भात माहिती विचारण्यासाठी फोन केला असता त्यांचा मोबाईल क्र. ९८२२७३७४०१ हा बंद सांगत होता त्यामुळे त्यांची बाजू समजू शकली नाही

पिसेगाव, उंदरी, आडस रस्त्यावर काळी माती टाकून बोगस रस्ता करत आहेत त्यामुळे या बोगस कामाची चौकशी करून गुत्तेदार व संबंधित अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यात यावी अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल. सामाजिक कार्यकर्ते सुशील नेरकर यांनी म्हटले आहे.

# शासकीय कार्यालयासमोर दारु विक्री?

### चिंचोली (मा)अवैध दारू विक्री बंद करण्यासाठी किती बक्षीस ?




पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील चिंचोली माळी येथील अवैध दारू विक्री करणाऱ्या धाब्यावर कार्यवाही करण्यात येत नाही पोलीस प्रशासन कार्यवाही करण्यासाठी हतबल झाले आहे का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.तसेच प्रशासनाचे व चिंचोली माळी येथील धाब्यावाल्यांचे असे काम झाले आहे साहेब तुम्ही आम्हाला पकडल्या सारख करा आम्ही दारु विक्री करत नाही असे करतो नंतर प्रशासन शांत झाले की अवैध दारू चिंचोली माळी येथे जैसे थे सुरू होते परंतु एकाही धाब्यावर कार्यवाही केली जात नाही तसेच चिंचोली माळी येथे शासकीय कार्यालयांच्या समोर खुलेआम अवैध दारू विक्री केली जाते आहे तर उद्या नागरिकांनी केज तहसील कार्यालयाच्या समोर अवैध दारू विक्रीस सुरू केले तर तहसीलदार साहेब चालेल का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे कारण चिंचोली माळी येथे चौकात शासकीय कार्यालयांच्या समोर खुलेआम अवैध दारू विक्री तरी सुद्धा प्रशासन कुठल्याही प्रकारची कार्यवाही करत नाही याचा अर्थ असा होतो जसी काय तहसीलदार पान २ वर

# महापुरुषांच्या विचाराने परिवर्तन निश्चित

### डॉ. गोपाल बछिरे:चिंचोली सांगळे जयभिम महोत्सव



पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:महापुरुषांचे फोटो डोक्यावर घेऊन नाचण्यापेक्षा त्यांचे विचार डोक्यात पेरा म्हणजे परिवर्तन निश्चित प्रो.डॉ. गोपाल बछिरे चिंचोली सांगळे येथे आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त कार्यक्रमात प्रो.डॉ. गोपाल बछिरे यांनी आपल्या प्रमुख भाषणात समाजाचे प्रबोधन करत आपले विचार मांडले.

आपल्या भाषणात ते पुढे म्हणाले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता मुलक समाजाच्या निर्मितीची मुहूर्तमेढ रोवली व बाबासाहेब हे एका समाजाचे धर्माचे किंवा प्रांताचे नसून ते संपूर्ण विश्वाचे महामानव आहेत त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाला संविधानाच्या माध्यमातून न्याय दिला त्यामुळे ते सर्वांचे आहे आणि म्हणून कोलंबिया पान २ वर

# बीएसएनएल कार्यालयात अभिवादन

### नियोजन:महापुरुषांची जयंती उत्साहात साजरी

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:येथील भारत संचार निगम लिमिटेड कार्यालयात युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, आणि भारतरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून उपमहाप्रबंधक श्री आनारे साहेब हे तर प्रमुख पाहुणे म्हणून जालिंदर भोरे हे उपस्थित होते.याप्रसंगी प्रमुख पाहुणे जालिंदर भोरे यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जाती तोडो समाज जोडो या विषयावर सविस्तर चर्चा केली तसेच तरुणांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रेरणा घ्यावी व महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेल्या कार्याचे सविस्तर विवेचन केले. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत सेवानिवृत्त दूरसंचार अधिकारी श्री भीमराव कांबळे यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर महात्मा फुले व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याची माहिती दिली पान २ वर





परळी: भारतीय संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जयंती निमित्ताने पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करताना आ.धनंजय मुंडे आदी.



बीड : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरातील पुतळ्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी युवा नेते हेमंत क्षीरसागर यांच्यासह आदी.

# न्यायाधीशपदी झाली निवड

### अभिनंदनिय:ॲड.विशाल कवडे यांचा सत्कार

पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:तालुक्यातील ग्रामीण भागातील,शेतकरी कुटुंबातील व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कन्हेरवाडी शाळेत प्राथमिक शिक्षण घेतलेले कन्हेरवाडी गावचे भूमिपुत्र ड.विशाल कवडे यांची महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेतून न्यायाधीश पदी निवड झाली.याचा शाळेला सार्थ अभिमान आहे. शाळेने केलेला हा सत्कार शाळेतील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. शिक्षणाने माणूस सुसंस्कृत होतो.तसा ध्येय व चिकाटीने मिळवलेल्या ज्ञानाच्या बळावर उच्चपदी विराजमान ही होतो.हे विद्यार्थ्यांना अनुभवता आले.



शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष कपिल कवडे,उपाध्यक्ष विजयकुमार कवडे शाळेचे मुख्याध्यापक भंडारे बी.एन.अशोक कवडे, श्री.शिवछतपती वाचनालयाचे अध्यक्ष निवृत्ती जगताप,ड. दत्ता कवडे यांच्या हस्ते ड.विशाल कवडे यांचा सत्कार करण्यात आला तसेच शाळेतील नवोदय प्रवेश पात्र विद्यार्थी,मंथनमध्ये प्राविण्य मिळविले विद्यार्थी व इयत्ता पहिली मध्ये नूतन प्रवेश घेतलेले विद्यार्थी यांना मान्यवरांच्या हस्ते लेखन साहित्याचे वाटप केले.तसेच ड.विशाल कवडे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की मी या शाळेतील शिक्षकांच्या कडक शिस्तीमुळे व शिकवण्यामुळे घडलो. तसेच मन लावून चांगला अभ्यास केला तर चांगले यश ही मिळते व जीवनात मान सन्मानाच्या,सत्काराच्या संधी उपलब्ध होतात.भारतरत्न. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह कार्यक्रम चालू असून सगळीकडे संविधान जागर चालू आहे. संविधानावर आपल्या देशाचा कारभार चालतो.त्यामुळे संविधानाचा आदर करा.असे मत मांडले. शाळेच्या रंग-रंगोटीसाठी २१००० रुपये देणगी दिली.कार्यक्रम पान २ वर

## आ:धनंजय मुंडे | दर्जेदार पद्धतीने कामाच्या सूचना

# तीर्थक्षेत्र विकास आराखडा कामांची पाहणी

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी: बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या परळीतील प्रभू वैद्यनाथ मंदिर व परिसराच्या विकासासाठी वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून मंजूर असलेल्या २८६ कोटी रुपयांतून सुरू असलेल्या विविध कामांची माजी मंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी आज अधिकाऱ्यांच्या तसेच कंत्राटदारांच्या समवेत पाहणी केली.

मंदिर परिसरात भव्यदर्शन मंडपाचे काम सुरू असून आता चौथ्या मजल्याचेही काम पूर्ण झाले आहे. त्या ठिकाणी ग्लास री-इन-फोर्सड काँक्रीट पद्धतीने काम पूर्ण करावे, दगडी पायऱ्यांचे काम तसेच परिसरातील अन्य वस्तूंच्या कामाच्या संदर्भात पुरातन महत्व जपून तसेच दर्जेदार पद्धतीने काम पूर्ण केले जावे अशा सूचना यावेळी धनंजय मुंडे यांनी संबंधित कंत्राटदार तसेच अधिकाऱ्यांना केल्या आहेत. वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी २८६.६८ कोटी रुपयांचा आराखडा मंजूर करण्यात आलेला असून यातून आतापर्यंत एका भव्य अशा भक्त निवासाचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. प्रदक्षिणामार्गाचे काम देखील अंतिम टप्प्यात असून, भव्य असे प्रवेशद्वार दगडी पायऱ्या दर्शन मंडप अशी कामे सध्या सुरू आहेत. मंदिर परिसरातील वास्तूंचे पुरातन महत्व जपण्याबरोबरच दर्जे दार पद्धतीने व निर्धारित वेळेत काम पूर्ण करावेत अशा सूचना धनंजय मुंडे यांनी यावेळी संबंधितांना केल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, राजा खान, जाफर खान, आर्किटेक्ट श्री बांगड, शिल्पकार गनीभाई यांसह अधिकारी - कर्मचारी आदी उपस्थित होते.



# रांजणीत खुल्या टेनिस बॉल स्पर्धा



पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:तालुक्यातील रांजणी येथे हजरत खाजा बद्रुद्दीन बाबा उर्स निमित्त खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रम दिनांक सात एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला यावेळी मा. सरपंच अलीम भाई शेख. तंटामुक्ती अध्यक्ष मतीन पटेल,भाजपा नेते फेरोजखाँ पठाण,सरपंच राजाभाऊ आगरकर,उपसरपंच अन्सार शेख,वाहेद शेख,ईलाही पटेल,ऊसकमिटी अध्यक्ष शफिक पटेल,ताहेर पटेल,अलीबाबा पटेल, तलाठी नवले इत्यादी मान्यवर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.